


हीरकमहोत्सवी
कोल्हापूर चित्पावन संघाचे
मुखपत्र

स्थापना : १९६४

६१

मासिक



# नवस्नेह


वर्ष ११ वे : अंक ११
फेब्रुवारी २०२६


## जन्मसोहळा - जाणत्या राजाचा !



शिवनेरीवर शिवराय जन्मले । हिंदवी स्वराज्याचे तोरण बांधले ।।




प्रेषक

**कोल्हापूर चित्पावन संघ (रजि.)**

४२८, बी वॉर्ड, तुळजाभवानी संकुल, गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ,
कोल्हापूर ४१६ ०१२. फोन : ०२३१-२५४६२२५, मोबा. ७६२०५४६२२५
Visit us on www.kolhapurchitpavan.com
ईमेल : kolhapurchitpavan@gmail.com
https: //www.facebook.com/kolhapurchitpavan

## – कोल्हापूर चित्पावन संघातर्फे बोडण सोहळा –

आपल्या समाजाचा कुलाचार म्हणजे बोडण सोहळा ! यावर्षीही संस्थेतर्फे सार्वजनिक बोडण सोहळा रविवार, दि. १ मार्च २०२६ रोजी संस्थेचे 'रमा–दामोदर सभागृह' येथे करणेचे ठरवत आहोत. बोडणाची सर्व व्यवस्था संस्थेतर्फे करण्यात येणार असून खर्च प्रतिबोडण रु. ४,०००/– इतका व एक जादा पान प्रसाद भोजन रु. २५०/– इतका येईल.

(एका बोडणास ४ सवाष्ण व १ कुमारिका – प्रसाद भोजन समाविष्ट)

संपर्क : कोल्हापूर चित्पावन संघ, मंगळवार पेठ, कोल्हापूर. फोन : (०२३१) २५४६२२५

श्रीमती वासंती लिमये : ९१५८८५९६०३ सौ. संगीता आपटे : ८१४९५८००३४

## बहारदार, रंगलेला कार्यक्रम 'जादूची पेटी' !










सत्कार स्वीकारताना श्री सिद्धीविनायक हॉस्पिटलचे डॉ. चंद्रकांत पाटील,
जीडीके एन्टरप्राईजेसचे श्री. कुलकर्णी, महाराष्ट्र इंजिनिअरींगचे श्री. नितीन वाडीकर,
एस.जी.फायटो फार्माचे श्री. दिलीप गुणे आणि दामोदर शिवरामचे श्री. सुबोध गद्रे

कोल्हापूर चित्पावन संघाने आयोजित केलेला 'जादूच पेटी' हा स्वरतालाचा अद्‌भुत संगम म्हणावा असा बहारदार कार्यक्रम रविवार, दि. १ फेब्रुवारी २०२६ रोजी आनंदभवन, सायबर कॉलेज येथे संपन्न झाला. या कार्यक्रमाचे प्रायोजक होते श्री सिद्धीविनायक हॉस्पीटल, महाराष्ट्र इंजिनिअरींग, जीडीके एन्टरप्राईजेस, एस.जी.फायटो फार्मा आणि दामोदर शिवराम आणि कंपनी. आतिथ्य साथीदार होते हॉटेल रेडियन्ट आणि खरे मंगल कार्यालय.

दिवंगत उपमुख्यमंत्री कै. अजित पवार यांना श्रद्धांजली अर्पण करून कार्यक्रमाला सुरुवात झाली. उपाध्यक्ष श्री. प्रसाद भिडे यांच्या प्रास्ताविकानंतर हार्मोनियम या विदेशी वाद्याचा भारतात कसा आणि कधीपासून प्रसार होत गेला आणि ते मैफिलीतील मुख्य वाद्य कसे झाले याचा रंजक आढावा श्री. आदित्य ओक यांनी विषद केल्यानंतर वंदे मातरम्‌ या स्फूर्तिगीताने कार्यक्रमाला प्रारंभ झाला. येऊ कशी प्रिया, वाजले की बारा, याड लागले, आनेवाला पल, निले निले अंबर पर अशी एकापेक्षा एक सरस गाणी श्री. आदित्य ओक व श्री. सत्यजित प्रभू यांनी सादर केली. त्यांना साथ द्यायला प्रसिद्ध तबलावादक व ढोलकी–ऑक्टोपॅड वादक श्री. प्रसाद पाध्ये आणि श्री. प्रभाकर मोसमकर होते. कार्यक्रमाच्या मध्यंतरात संघामार्फत उपस्थित रसिक प्रेक्षकांना कॉफी बिस्किट देण्यात आले आणि सर्व प्रायोजकांचे सत्कार करण्यात आले. संघाचे अध्यक्ष श्री. मकरंद करंदीकर यांनी सर्व प्रायोजकांचे त्याचबरोबर कार्यक्रमाला उपस्थित असलेल्या रसिक प्रेक्षकांचे आभार मानले !

## कोल्हापूर चित्पावन संघाचे मुखपत्र

# नवस्नेह

**वर्ष ११ वे : अंक ११ : फेब्रुवारी २०२६**

- **संपादक** श्री. सदानंद दिनकर मराठे
- **कार्यकारी संपादिका** प्रा.सौ. मंजुश्री गोखले 8805355200
- **सल्लागार** सौ. पल्लवी देशमुख 9420455984


## अनुक्रम


१) **संपादकीय /४**
२) **परशुराम मातृहत्यारा?/५** – वैशाली पंडित
३) **मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा /७** – ओंकार गाडगीळ
४) **दुर्गाताई जोशी /८** – वैदेही जोशी
५) **ज्ञानसूर्याची सावली /१०** – सौ. मंजुश्री गोखले
६) **सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी /१३** – सौ. मंजुश्री गोखले
७) **भारतरत्न महामहोपाध्याय /१६** – विकास मेहंदळे
८) **मनाला खुपणारं कागदावर /१९** – कमला हर्डीकर
९) **पुण्यातील राहूल थिएटरचे चंदूशेठ /२२**
१०) **आळूची वडी : पदराआड दडलेले स्त्री मनाचे लेअर्स /२३** – मंगेश दारके
११) **वधूवर माहिती यादी /२५**



- **मुद्रण स्थळ** मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए, शिवाजी पेठ, कोल्हापूर. मोबा. ९९२१६६९६६६
- **अक्षरजुळणी** ज्योती अरुण काटवे विराज कॉम्प्युटर सर्व्हिसेस, कोल्हापूर. मोबा. ९०२१२३४८९०





हीरकमहोत्सवी

## कोल्हापूर चित्पावन संघ

मंगळवार पेठ, फोन : ०२३१-२५४६२२५
०२३१-२९९१६७३, मोबा. ७६२०५४६२२५

- **संचालक मंडळ**

**श्री. मकरंद विष्णू करंदीकर** (अध्यक्ष) 9421113005
**श्री. प्रसाद प्रभाकर भिडे** (उपाध्यक्ष) 9822248500
**श्री. केदार वसंत जोशी** (कार्यवाह) 7588839527
**श्री. संतोष वसंतराव साने** (सहकार्यवाह) 8459019091
**सौ. संगिता संजय आपटे** (खजिनदार) 8149480034

- **संचालक**

श्री. सदानंद दिनकर मराठे 0231-2541823
सौ. सीमा सुरेश गोखले 9420455159
श्री. हृषिकेश भालचंद्र लिमये 9404260470
श्री. किरण विनायक जोशी 9890003810
श्री. श्रीकांत अनंत लिमये 9423980380
श्री. दत्तात्रय वामन आपटे 9422043366

- **तज्ञ सल्लागार**

श्री. प्रसाद खाडिलकर 9822084305

- **सल्लागार**

श्री. विष्णू दिनकर वझे 9637255984
श्री. मोहन मधुकर दातार 9881874701
श्री. शिरीष श. ताम्हनकर 9422590025
श्री. निनाद खरे 7057151549
श्री. महेश खाडिलकर 9422046611


**कामकाजाची वेळ**
**सकाळी १० ते सायंकाळी ६ (साप्ताहिक सुट्टी नाही)**

या अंकातील लेखातून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही.



**'नवस्नेह' मासिकाची ठेव, वर्गणी अगर इतर कोणत्याही पेमेंटसाठी 'कोल्हापूर चित्पावन संघाचे' खात्यांची माहिती पान क्र. २१ वर दिली आहे.**

# संपादकीय...



नमस्कार मंडळी !

कसे आहात? मकर संक्रांत साजरी करून गोड बोलून झालं का? थंडी मात्र अजून राहिली आहे बरं का ! थोडा आजाराचा असला तरी हा थंडीचा माहौल मस्त आहे ना? त्यातही सकाळी छान थंडी असते. या थंडीत पहाटे उठावं, गरम गरम वाफाळता चहा किंवा कॉफी घ्यावी. (हे सगळं इतरांनी करावं... करताय ना? Keep it up) असो ! अशा मस्त थंडीत दुलई पांघरून झोपून रहावं, यासारखं सुख नाही. (हे मी आवर्जून करते हं !) आणि तुमच्या सर्वांसाठी या थंडीत हातात चहाचा मग घेऊन नवस्नेह वाचण्याची मजा तर औरच ! म्हणून तर नवस्नेहमध्ये आम्ही उत्तमोत्तम विषयांवरचे उत्तम लेख देतो. वाचताय ना?

आता हेच बघा ना ! भगवान परशुरामांनी मातेचा म्हणजे रेणुका देवीचा वध केला असं आपण मानतो. पण यामागचं सत्य काय आहे यापासून आपण अनभिज्ञ आहोत. ते सत्य या महिन्याच्या अंकात तुम्हाला वाचायला मिळणार आहे. तर पुण्याच्या प्रसिद्ध राहूल थिएटरची जन्मकथा जी मनोरंजक आहे ती सुद्धा तुम्हाला वाचायला मिळणार आहे. शिवाय आपली नेहमीची 'ब्राह्मण भारतरत्न', 'कर्तृत्ववान ब्राह्मण स्त्रिया' ही सदरे आहेतच. असा सर्व विषयांना स्पर्श करणारा, वाचनीय असा आपला नवस्नेहचा अंक आहे !

मित्रांनो, हा फेब्रुवारी महिना ! म्हणजे दहावी, बारावीच्या परीक्षांचा महिना ! आपली आणि आपल्या पाल्याची प्रकृतीची काळजी घ्या. अपेक्षांचं ओझं पाल्यावर लादू नका आणि मैत्रिणींनो, तुम्हीही स्वत: सुपरवुमेन बनण्याचा अट्टाहास करू नका. आज या नको त्या स्पर्धेला आपण बळी पडतो आहोत ते टाळलं तर लाईफ कदाचित आणखी सोपं होईल.

**रास्तेमें कई मोड आएँगे।**
**खुशियोंके पल भी गुजर जाएँगे।**
**जो चलते रहेंगे अपने हौसलें से।**
**उनके लिए जीत के दिन भी आएँगे।**

हे लक्षात असू द्या. तुमच्या अपेक्षांचं ओझं त्याला जगणं अवघड करेल. जीवनाशी त्याची दोस्ती होऊ द्या. नैराश्याशी नको. हे जीवन कोड्यासारखं आहे. सुटलं तर सापे, नाही सुटलं तर फारच अवघड.

**काश दूरसे ही तेरी आहट हम जान लेते।**
**तो ए जिंदगी हम तुम्हे पहचान लेते।**

पण तसं होत नाही ना? म्हणूनच जास्त चिंता करू नका. टेन्शन घेऊ नका, देऊही नका. आज-कालच्या तरुणांच्या भाषेत चिल्ड रहा. मुलांनाही चिल्ड राहू द्या. तेव्हा पाल्य आणि पालक चिल्ड राहण्यासाठी नवस्नेहच्या परिवाराकडून दहावी, बारावीच्या विद्यार्थ्यांना परीक्षांसाठी सुयश चिंतीते.

All the best my dear students. Best of Luck आणि थांबते.

धन्यवाद !

आपली स्नेहांकिता,
**सौ. मंजुश्री गोखले,** मो. ८८०५३५५२००


**नवीन तहहयात सभासद होण्याची संधी**

**संघाची सभासद वृद्धी योजना सुरू झाली असून या योजनेत रु. २६०/- मध्ये तहहयात सभासद होण्याची संधी मिळणार आहे. तरी ज्ञाती बांधवांनी या सुवर्णसंधीचा फायदा घ्यावा.**

# परशुराम मातृहत्यारा ??

परशुराम हा महर्षी जमदग्नींचा पुत्र होता. पित्यासारखाच तो शीघ्रकोपी होता. लढवय्या होता. विद्वान होता. त्याने कोकणभूमीची निर्मिती केली. परशुराम सप्तचिरंजीवांपैकी एक आहे.

इथपर्यंत परशुरामांबद्दल माहिती मिळाल्यावर आदर निर्माण झाला होता. लहानपणापासून कथाकीर्तनाकडे ओढा असल्याने ही माहिती अनेकदा मिळाली. पण जेव्हा बुवांनी कीर्तनात, परशुरामाने पिता जमदग्नी यांच्या आदेशानुसार माता रेणुकेचे शीर उडवून तिचा वध केला आणि नंतर पित्याला विनवणी करून मातेला परत जिवंत केले ही कथा सांगितली तेव्हा अंगावर शहारे आले. परशुरामांबद्द्ल एक अढी बसली. असा कसा पोटचा मुलगा तोही विचारी, विद्वान वगैरे असणारा आईचा जीव घेतो ?

कळत नकळत परशुरामांबद्दल दुरावा किंवा एक तुटकपणा निर्माण झाला.त्या विषयात आपलेपणा किंवा जिव्हाळा निर्माण व्हायला काही कारणही नव्हतं.अगदी ज्या कोकणात आपण राहतो त्याची निर्मिती कशी केली असेल याची साधी जिज्ञासा ही कधी जागी झाली नाही. पण हा दुरावा समूळ नाहीसा व्हावा अशी या चिरंजीवाचीच इच्छा असावी.

चिपळूण मधील परशुराम देवस्थानाचे विश्वस्त श्री.प्रशांत पटवर्धन यांना भगवान परशुराम यांच्या जीवनातील प्रसंगांवर कथालेखन करायचे होते.हाती असलेल्या माहितीचं कथेत रूपांतर कसं करावं याचं मार्गदर्शन त्यांना हवं होतं. योगायोगाने त्यांच्या जवळच्या मित्राने.जो मलाही लेखिका म्हणून चांगलं ओळखतो, त्याने माझं नाव सुचवलं आणि आमची फोनवरची कथा कार्यशाळा सुरू झाली.

प्रशांत उत्तम विद्यार्थी आहेत असं माझ्या लक्षात आलं. कथालेखनाचा गृहपाठ ते चोख करत गेले. ते माझ्याकडून काय शिकले यापेक्षा मला परशुरामांकडे पाहण्याची जी दृष्टी मिळाली ती मला जास्त मौल्यवान वाटते. परशुरामांचं चरित्र अनेक प्रसंगांतून समोर येत गेलं. सर्वात मला उत्सुकता होती ती त्यांच्या मातृहत्यारा या प्रतिमेबद्दल ! तर त्याबद्दल संशोधकांनी शोधलेली माहिती अशी...

कामरूप प्रदेशातील संपूर्ण जमीन मृतप्राय झालेली होती. पाण्याचे मोठ्या प्रमाणावर दुर्भिक्ष निर्माण झालेलं होतं.वर्षानुवर्ष पाणी नसल्यामुळे सर्वत्र शुष्कता होती. मानवी जीवन, पशुपक्षी, कीटक, वनस्पती जीवन यांचा सर्वनाश होत होता.

कसेबसे तग धरून असलेले काही शेतकरी महर्षी ऋचिक यांच्या आश्रमात आले. ऋचिक हे जमदग्नींचे पिता. त्यांनी आपल्या कामरूप भूमीला सुजला सुफला करून सजीवसृष्टीला संजीवनी देण्याची याचना केली. जवळच असलेल्या जमदग्नी ऋषींनी भगवान परशुरामाला आदेश दिला. 'राम, तुम्ही त्या प्रदेशात जाऊन तिथल्या लोकांत विश्वास निर्माण करा आणि ती मृत झालेली भूमी पुन्हा जिवंत करा.'

आपल्या तीन अनुयायांना घेऊन परशुराम मार्गस्थ झाले. सांगाडा झालेले वन प्रदेश, डोंगर वाटा, नदीचे कोरडे पात्र पार करत ते कामरूप प्रदेशात पोचले. कामरूपचं स्वरूप भयावह होतं. भूमीचा कण न् कण पाण्यासाठी तडफडत होता. आक्रोशत होता. परशुरामांनी जमिनीची पाहणी केली. अभ्यास केला. भूजलाचा अंदाज घेतला. भूमीचा ध्वनी ऐकण्याचा प्रयत्न केला. मग ब्रह्मपुत्रा नदीच्या उपनद्या जिथून प्रवाही होतात तिथून जल वाहत येऊ शकेल का याचा अंदाज घेतला.

कामरूप प्रदेशाच्या बाजुलाच लोहित नावाचा प्रचंड पर्वत होता. रामांनी तिथल्या स्थानिकांना बरोबर घेऊन लोहित पर्वत पार केला. त्या पर्वतापलिकडे एक मोठे सरोवर होते. जवळूनच एक नदीही वाहात होती. रामांनी संपूर्ण जलाशयाला एक प्रदक्षिणा घातली. भोवतालाचे सूक्ष्म निरीक्षण केले. भार्गवरामांनी या नदीतीरावर आपल्या वास्तव्यासाठी एक आश्रम बांधला.

नदीच्या परिसराचा कसून अभ्यास केला. त्या परिसरातील बदलांचा मागोवा घेतला. परिसरातील वयोवृध्द शेतकऱ्यांना विश्वासात घेतलं. त्यांच्या आठवणीतल्या जल व्यवस्थापनाची माहिती घेतली.

या कार्यात दैवी अधिष्ठान असावे म्हणून शिवाची आराधना, होम, जप सुरू केले. अखेर शिवशंकरांनी दृष्टांत दिला. 'आग्नेयेला जा. तिथे भूमीच्या एका कोपऱ्यात हिमनगांनी अडवलेलं विशाल कुंड आहे. त्या कुंडातील जल शीतल, मधुर असून प्राणवर्धक आहे. हेच जल कामरूप प्रदेशाला संजीवन देईल. यशस्वी भव !'

शिवाच्या दृष्टांतानुसार परशुरामांनी जल आणि भूमी विषयातील अनुभवी व्यक्ती, वयोवृध्द शेतकरी, ग्रामस्थ आणि विद्यार्थी यांना साहाय्यासाठी आवाहन केलं. चर्चा केली. आखणी केली. तसंच लोहित पर्वताच्या पायथ्याशी असलेल्या लोकांनाही विश्वासात घेतलं. संयमित शब्दात योजना समजावून दिली.

आपल्याला लोहित पर्वताचा एक भाग फोडावा लागणार आहे. त्यामधून एक मार्ग निर्माण करायचा आहे. जलाशयातून निघणारा एक झरा या मार्गाने तुमच्या प्रांतात आणायचा आहे. एकदा या पाण्याचा ओघ सुरू झाला की ओसाड भूमी हरित होईल. पीक येईल. सजीवसृष्टी पुन्हा बहरेल !

अर्थातच अनेक शंकाकुशंका निघाल्या, नकारात्मक विचार आले, पण परशुरामांनी कुशलतेने निवारण केलं. त्यांच्या आवाहनातील तळमळ प्रभावी ठरली. मग मात्र जोमाने, जिद्दीने आणि अचल निश्चयाने कामाला सामूहिकरित्या सुरूवात झाली.

लोहित पर्वतातील कठीण खडक फोडले गेले. पर्वताची शकले केली. विशाल पाषाण फोडून त्यामागची माती बाजूला केली. पर्वत कापून पलिकडून अलिकडे प्रवासासाठी मार्ग खोदला गेला. जवळच वाहणारी एक प्राचीन नदी वाळलेली होती. पण तिचा मूळ स्रोत जिवंत होता. तिथून पाट काढण्यात आला. जुना प्रवाह शोधून त्याला नव्याने या मार्गांशी जोडलं गेलं. आणि... कामरूप प्रदेशातून विस्तीर्ण नदी खळाळून वाहू लागली. तिच्या प्रवाहाने भूमीला नवा जन्म मिळाला. लोहित पर्वतांतून ही नदी आली म्हणून या नदीचे नावही 'लोहित नदी' ठेवलं गेलं. कामरूपची जनता भगवान परशुरामांना शतशः धन्यवाद देत होती.

आता परतीचे वेध लागले होते. सारे विश्रांती घेत हसत खिदळत श्रमपरिहार करत होते. पराशर मुनींना परशुरामांची चेष्टा करण्याची लहर आली. 'रामा, एकीकडे तर तुम्ही म्हणता भूमी आपली माता आहे; आणि तुम्ही तर तिचं पर्वतस्वरूप मस्तकच कापलंत.'

भार्गवराम शांत होते. ते म्हणाले, 'हो. पर्वत म्हणजे भू मातेचं मस्तक आहे. पण तेच मस्तक इतकं मोठं झालं की पलीकडची भूमी ओसाड झाली. मी शिरच्छेद नाही केला. फक्त मार्ग मोकळा केला. मृत जमीन पुन्हा जिवंत झाली. म्हणजे आईला पुनः जिवंत केलं. पण ही माझ्या पित्याची आज्ञा होती.'

सत्य, त्रिवार सत्य! म्हणजे परशुरामांनी पिताज्ञेने आपल्या मातेचा शिरच्छेद केला आणि तिला संजीवनी केलं. या रूपकावर सारेच हसले.

गंमतीत सुरू झालेली चर्चा होती ती. तिथे उपस्थित असलेल्या लोकांनी सहज म्हणून इतरांना सांगितली. शब्दांनी आकार घेतला आणि हळूहळू ती गोष्ट कर्णोपकर्णी झाली. लोककथांमध्ये मिसळली आणि तिच्यातला लाक्षणिक अर्थ हरवला. कथेचा गाभा, सूचक तत्वज्ञान बाजूला राहिलं. लोकांनी फक्त शाब्दिक अर्थाने ती स्वीकारली. पिढ्यानुपिढ्या ती तशीच सांगितली गेली. भूमीत प्राण फुंकणाऱ्या परशुरामाचे श्रम, अभ्यास, संघटन कौशल्य, भूजल मन व्यवस्थापना-साठीचे अभियांत्रिकी ज्ञान सगळं सगळं विसरलं गेलं आणि... मातृहत्यारा हा विपरीत अर्थाचा डाग लागला.

मंडळी, मी प्रशांत पटवर्धनांची आजन्म ऋणी आहे. नवनिर्मितीच्या या विद्वान ऋषींची मला ओळख झाली. मनातला हा आकाशकंदील उजळला आणि माझ्या कोकण भूमीच्या निर्मात्याला मी नव्याने मनोमन दंडवत घातला !

**– वैशाली पंडित**

# मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा !

शेगाव संस्थान येथे आज यात्रेच्या पाचव्या दिवशी पोहोचलो. सकाळी अगदी प्रसन्नपणे गजानन महाराजांच्या दर्शनाला गेलो. संस्थानच्या आतील शिस्त, काटेकोर नियोजन व सेवाभाव पाहून समाधान होते. गजानन महाराजांचे दर्शन घेतले व त्यांना यात्रेला माझ्याबरोबर यावे अशी विनंती केली व त्यांना बरोबर घेऊन मित्रांच्या गाडीने पुन्हा राजूर गावी जिथे आलो नि सायकल ठेवली होती तिथे संध्याकाळी पाच वाजता येऊन सायकल घेऊन गणपती मंदिराच्या मागे असलेल्या हनुमान मंदिरात वस्तीला गेलो.

कोल्हापूरहून आलेले माझे मित्र माझा निरोप घेऊन कोल्हापूरला परतले पुन्हा एकदा मी आणि श्री गजानन महाराज, रात्री मंदिरात आणखीन एक मंदिराची देखभाल करणारा भक्त वस्तीला होता. छान झोप लागली. पहाटे लवकर उठलो व समोरील एका घरात रात्री बोलणे झाल्याप्रमाणे त्यांनी पाण्याची भरलेली बादली घराबाहेर ठेवली होती त्यामधूनच स्नान उरकले व पूजा केली.

मंदिरातील त्या काकांचा निरोप घेतला त्यांनी त्यांच्याकडील एक जाड दोर मला दिला व पुढे उपयोगी पडेल असे सांगितले, मी पण तो दोर बॅगेत ठेवला व प्रवास सुरू केला. काल आराम झाला होता व आत्तापर्यंतच्या प्रवासाने पायपण सरावले होते त्यामुळे अंतर लवकर कापले जात होते, वाटेत येणारी छोटी छोटी गावे मागे पडत होती. भोकरदन येथे डॉक्टर राहुल चौहान भेटले. तेही सायकलपटू होते त्यामुळे त्यांनी माझी विचारपूस केली.

सिल्लोड गावातून पुढे अजंठा येथे आलो. इथेच अजंठाची प्रसिद्ध लेणी आहेत. भूक लागल्यामुळे एका ढाब्यावर भिक्षा मागितली. मालकांनी पोहे दिले. पोटाला थोडासा आधार मिळाला, पण भूक पूर्ण क्षमली नव्हती. त्यानंतर पहुर, जामनेर अशा गावातून पुढे जात राहिलो.

मध्येच श्री. कन्हैयाजी भेटले. हे मूळचे जामनेरचे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते होते. त्यांनी मला चहापान करण्यासाठी थांबवले व जेव्हा त्यांना समजले की माझे जेवण झालेले नाही तेव्हा त्यांनी जवळच असलेल्या त्यांच्या परिचयाच्या श्री. नामदेव चौहान यांच्या दुकानात नेले. त्यांनी स्वतःसाठी घरातून आणलेला डबा मला दिला व आग्रहाने जेवायला दिले.

रात्री जळगाव जिल्ह्यातील बोधवड गावातील गजानन महाराज मंदिरात मुक्काम केला. सकाळी सहा वाजता प्रवास सुरू केला. मुक्ताईनगर मार्गे महाराष्ट्राची सीमा ओलांडून मध्यप्रदेशमध्ये प्रवेश केला. मी नर्मदा परिक्रमा पायी केल्यामुळे मला मध्यप्रदेशची माती व माणसे नवीन नव्हती, पण महाराष्ट्रापासून काही काळ दुरावण्याची सल मनात होती. ह्या सर्व सीमा भागात केळीची शेती मोठ्या प्रमाणावर होते. इच्छापुर हे मध्यप्रदेश मधील पहिले गाव. त्यानंतर दक्षिणेचे (पूर्वकालीन दख्खन) प्रवेशद्वार असणारे मुघलांचे मुख्य ठाणे जे छत्रपती संभाजी महाराजांनी सरसेनापती हंबीरराव मोहिते यांच्या नेतृत्वामध्ये लुटले होते ते म्हणजे बुऱ्हानपूर. त्यानंतर आसिरगड आहे. इथे जाताना मोठा घाट लागला. ह्या ठिकाणी भर दुपार झाली. कडक ऊन व घाटातील काम चालू असलेला धुळीचा रस्ता यामुळे दमछाक झाली व बरोबर असलेले पाणी पण संपले. अति श्रमामुळे व कडकडीत भुकेमुळे पोटातील कावळे पण ओरडण्याचे थांबले होते. पण जवळ कुठलेही गाव नव्हते. अशातच देवाची कृपा झाली व मला घाटामध्येच रस्त्याकडेला जेवणारे व उज्जैन येथे श्री महाकालाचे दर्शन घेण्यासाठी जाणारे अकोल्याचे प्रवासी दिसले. त्यांना विचारले असता त्यांनी मला

**पान १८ वर पहा...**

# दुर्गाताई जोशी

कोणत्याही समाज रचनेचा, सामाजिक बदलांचा, क्रांतीचा अभ्यास करावयाचा असेल तर स्त्रीला सोडून समाजाचा अभ्यास करणे केवळ अशक्य आहे.

इंग्रजांनी आपल्या पाशवी बळाने फोडा-जोडा या वृत्तीने अनेक उठाव मोडून काढले. स्त्रियांना पकडून त्यांचा छळ करून उठाव करणाऱ्या क्रांतिकारकांसंबंधी माहिती मिळवण्याचा प्रयत्न केला, परंतु इंग्रजांना आपल्या सहकाऱ्यांविषयी पतीविषयी माहिती पुरवल्याचा एकही दाखला इतिहासात सापडत नाही. याचाच अर्थ इंग्रजी सत्ते विरोधी मनापासून मूकपणे आणि आपल्या क्षमता मर्यादा यांचा आधार घेऊन प्रत्येक संघर्षात त्यावेळचा स्त्रीवर्ग कार्यरत होता. त्याकाळी एकत्र कुटुंब पद्धतीमुळे स्त्रीवर्ग तसा सुरक्षित होता. त्यामुळे कुटुंब व्यवस्थेबरोबरच समाज व्यवस्था टिकून ठेवणे, दृढ करणे यामध्येही स्त्रियांचा मोठा सहभाग होता. लिहिणे आणि वाचणे यापासून जरी स्त्रिया दूर असल्या तरी पण लहानपणापासूनच डोळसपणे समाजाकडे, समाजाच्या व्यवस्थेकडे पाहण्याची आणि कौटुंबिक व्यवहार जबाबदाऱ्या सांभाळण्याची घरातील महिलेची तयारी होती. त्यामुळे त्या अधिक व्यवहारी आणि कार्यक्षमही होत्या. दुर्गाताई जोशी हे याचे अत्यंत ज्वलंत उदाहरण!!

दुर्गाताईंचा जन्म १८८२ चा. त्यांचे मूळ गाव अकोला. विष्णुपंत दाते हे त्यांचे वडील.१८९८ मध्ये त्यांचे देहवसान झाले. यापूर्वीच आईही मरण पावल्या होत्या. त्यामुळे त्यांचे काका ॲड. नानासाहेब आणि काकू यांनी त्यांचा संभाळ केला. तेल्हारा येथील रामचंद्र जोशी या जोशी कुटुंबातील सधन व्यक्तीशी त्यांचा विवाह झाला. परंतु दुर्दैवाने दीड वर्षातच त्यांचे पती निधन पावले. त्या वेळच्या रूढी परंपरेप्रमाणे त्यांना विकेशा करणार हे नानासाहेबांना कळताच त्यांनी त्यांना अकोल्याला आणले. दुर्गाताईने स्वतःच्या पायावर खंबीरपणे उभे रहावे व आपले जीवन जगावे या हेतूने नानासाहेबांनी त्यांना महर्षी कर्वे यांच्या आश्रमात पाठविले.

१० वर्षे दुर्गाताई आश्रमात राहिल्या आणि गृहीत गमा ही पदवी घेऊनच त्या अकोल्याला परतल्या. महर्षी कर्वे यांच्या आश्रमात त्यांना जे शिक्षण मिळाले होते, ज्या उच्च ध्येयांचे मार्गदर्शन लाभले होते आणि स्त्रियांच्या दुःखाची त्यांना जाण आल्यामुळे अकोल्यामध्ये आल्याबरोबर दुर्गाताईनी स्त्रियांच्यामध्ये जागृती करून, स्त्रिया पुरुषांच्या बरोबरीने सर्व कार्यक्षेत्रात काम करू शकतात; हे सिद्ध करण्यासाठी प्रयत्न सुरू केले.

विधवेला घरातल्या घरात व्रतस्थ राहून आपले जीवन एका कोपऱ्यात, अंधारात घालवावे लागत असेः त्याविरोधी दुर्गाताईंनी प्रथम बंड उभारले. जातीव्यवस्था न मानणाऱ्या दुर्गाताईंनी अस्पृश्यांच्या वस्त्यांमधून महिलांची जागृती सुरू केली. आपण एकट्यानेच काम करण्यास मर्यादा येतात ही जाणीव झाल्यामुळे त्यांनी अनेक तरुणींना आपल्या विचाराने आणि आचाराने प्रभावित केले.

यामध्ये सरस्वती मेहरे, सुभद्राताई जोशी, यमुनाबाई ताकवाले, मामी पांडे, ताराबेन मश्रुवाला अशा अनेक स्त्रियांना त्यांनी सामाजिक कार्यात ओढले. या सर्वच भगिनी सामुदायिकपणे तसेच व्यक्तिगतरित्याही समाजाच्या निरनिराळ्या थरात विधायक कार्य करीत होत्या. कालांतराने दुर्गाताईंच्या या शिष्या समाजाचे व्यापक नेतृत्व करू लागल्या.

१९२७ मध्ये अकोला येथे प्रथम तिरंगा झेंडा लावण्याचा मान त्यांनी मिळवला. १९२७ ते १९४२ पर्यंत दुर्गाताईंनी विदर्भात अनेक व्याख्याने दिली. महत्त्वाचे म्हणजे स्त्रियांना घराबाहेर काढून, व्याख्याने कशी द्यावीत, गांधी विचारांचा प्रसार कसा करावा, कोणकोणती विधायक कामे कशा पद्धतीने करावीत याबाबतचे त्या मार्गदर्शन करीत असत. पण आपले मार्गदर्शन, बुद्धीवाद, भावना, राष्ट्रप्रेम, त्यागीवृत्ती

यांचे योग्य मिश्रण करूनच त्या ते स्त्रियांच्या समोर मांडीत असत. त्यांची वैचारिक झेप निश्चितपणे अत्यंत उच्च होती. आपले विचार लेखणीद्वारे व्यक्त करण्याचे त्यांचे कौशल्य वाखाणण्यासारखे होते. दारुबंदी विरोधी निदर्शने करून दारू विक्रीचे प्रमाण त्यांनी खूपच खाली आणले. परदेशी मालावर बहिष्कार टाकण्यासाठी स्त्रिया आणि पुरुष यांना सक्रीय होण्यास मार्गदर्शन केले. मिठाचा सत्याग्रह असो किंवा जंगल तोडीचा कायदा असो या सर्वांमध्ये त्यांनी हिरिरीने भाग घेतला. त्यासाठी प्रभात फेऱ्या काढणे, झेंडा छापणे, शासनाने जप्त केलेले वाङ्मय जाहीर सभेमधून त्याचे वाचन करणे, चरखा मंदिरे चालवणे इत्यादी अनेक कामांमध्ये त्यांनी पुढाकार घेतला. यामुळे त्यांना वऱ्हाडची वाघीण असे गौरविले गेले आहे. त्यांनी वंदे मातरम्, विदर्भ कन्या, अशोक वन असे कविता संग्रहही प्रसिद्ध केले. या सर्व कवितांमध्ये त्यांची ज्वलंत राष्ट्रीय भावना उठून दिसते. १९२७ मध्ये काँग्रेसच्या वतीने दुर्गाताईंनी असेंम्बलीची निवडणूक लढवली आणि त्यामधे त्या यशस्वीही झाल्या. १९३० सालच्या व ३२ सालच्या लढ्यांमध्ये दुर्गाताईंना तुरुंगवास भोगावा लागला. तुरुंगात असताना गुन्हेगार स्त्रिया तसेच अन्य स्त्रियांना स्वातंत्र्य म्हणजे काय, आपला लढा कशासाठी आहे; त्यासाठी आपण काय केले पाहिजे इत्यादी बाबत त्या मार्गदर्शन करीत होत्या. ४२ च्या लढ्यामध्ये काही काळ त्यांना स्थानबद्ध करून ठेवण्यात आले होते. आपण विधवा आहोत. आपल्याला कोणाचा आधार नाही इत्यादी रडगाणे न गाता त्यांनी आपले सर्व जीवन स्त्रियांच्या सर्वांगीण उन्नतीसाठी वेचले. आजीवन त्यांनी संघर्ष केला.१९५७ साली स्वातंत्र्यसूर्य पाहिला अन् देहत्याग केला.

भारतीय स्वातंत्र्य लढ्याची संपूर्ण माहिती उपलब्ध करणे आजही कठीण आहे. स्त्रियांचा सहभाग नसता तर देशाला स्वातंत्र्यसूर्य पाहण्यासाठी अजून अनेक वर्ष लागली असती हे मात्र वास्तव आहे. स्वातंत्र्य लढ्यामध्ये स्वतःला झोकून देऊन पुरुषांच्या बरोबरीने स्वातंत्र्यसंग्रामात उतरलेल्या अनेक भारतीय स्त्रिया हे दृश्य संपूर्ण जगाला आश्चर्याचा धक्का देणारे होते हे मात्र खरे!!

**– वैदेही जोशी**
मोबा. ९५४५६३५४६५

## ज्ञानाई ग्रंथ सवलत योजनेचा लाभ घ्या !

नमस्कार, ज्ञानाई हा ग्रंथ लवकरच प्रकाशित होत आहे. सकाळ प्रकाशन या ग्रंथासाठी प्रकाशनपूर्व सवलत जाहीर केली आहे. माझी ज्ञानाईच्या सर्व वाचकांना अशी विनंती आहे की आपल्याला हा ग्रंथ आवडला असेल आणि संग्रही ठेवावा असा वाटत असेल तर या सवलतीचा तुम्ही फायदा घ्यावा. दुसरं असं की ग्रंथ प्रकाशित झाल्यानंतर मोबाईलवर दिली जाणारी ज्ञानाई थांबवावी असा माझा विचार आहे. त्यामुळे सातवा अध्याय पूर्ण होण्याची शक्यता कमी आहे. आपण पुढची ज्ञानाई प्रत्यक्ष ग्रंथातून वाचावीत, व अनुभवावीत अशी माझी विनंती आहे. इतके दिवस माझ्या ज्ञानाईला तुम्ही सर्व जाणकारांनी जो भरभरून प्रतिसाद दिलात त्याबद्दल मी तुम्हा सर्वांची ऋणी आहे. एक फेब्रुवारीला या ग्रंथाचे प्रकाशन आळंदी येथे माऊलींच्या समाधी समोर प्रसिद्ध कीर्तनकार, प्रवचनकार, व्याख्याते व ज्ञानेश्वरीचे अभ्यासक आणि आळंदी संस्थानचे विश्वस्त डॉ. भावार्थ देखणे यांच्या शुभहस्ते होणार आहे. या ग्रंथाचे online बुकिंग जोरात सुरू आहे. आपणही त्याचा फायदा घ्यावा अशी विनंती आहे. तसेच ज्ञानाई आत्ता बुक करता आली नाही तर ही शुभचिंतन कॉपी संपेपर्यंत तुम्हाला तुमच्या जवळच्या सकाळ कार्यालयात याच किंमतीत (५९९ रु.) मिळेल. शुभचिंतन प्रती संपल्यानंतर मात्र ज्ञानाईची किंमत अंदाजे ९९९ रुपये होईल. म्हणून कळकळीची विनंती आहे की ग्रंथ संग्रही ठेवायचा असेल तर लवकर खरेदी करावा. धन्यवाद !

**– मंजुश्री गोखले**

### शब्दप्रभुत्त्वाची साक्ष असलेल्या ‘ज्ञानाच्या सोपानाची’ जीवनगाथा

# ज्ञानसूर्याची सावली

### (लेखांक शेहेचाळिसावा)

दुसऱ्या दिवशी सकाळी चौघांनी पैठणला जाण्यासाठी आळंदी सोडली. आळंदीहून मजल दरमजल करत ही चौघंजण आपेगावला आली. तिथं त्यांचं वडिलोपार्जित घर होतं. पण तिथंही त्यांना हेटाळणीच मिळाली. विठ्ठलपंतांनी घेतलेला संन्यास आणि त्यानंतर पुन्हा त्यांनी स्वीकारलेला गृहस्थाश्रम, ही धर्माच्या विरोधी घडलेली बाब अजून आपेगावच्या ब्रह्मवृंदांच्या पचनी पडली नव्हती. त्या दोघांनी घेतलेल्या देहान्त प्रायश्चित्ता–नंतरही त्यांच्यावरचा कलंक पुसला गेलेला नव्हता आणि या निरागस लेकरांकडे बघूनही कुणाच्याच हृदयाला पाझर फुटला नव्हता. आपलं मूळ गाव, आपल्या वडिलांचं गाव, विठ्ठलपंत कुलकर्णी आपेगांवकर असं बाबा मोठ्या अभिमानानं सांगत ते गाव ! सोपान भिरभिरत्या नजरेनं पाहत होता. त्याच्या नजरेत कुतूहल होतं, औत्सुक्य होतं; निरागसता होती. पण त्याच्याकडे, त्याच्या भावंडांकडे पाहणाऱ्या त्या आपेगावच्या ब्रह्मवृंदांच्या नजरेत मात्र होता तिरस्कार, हेटाळणी, संताप, कुत्सितता ! त्या सगळ्यांच्या नजरेचे असे विखारी घाव झेलत चौघंजण गावाबाहेर पडली.

गावाबाहेर बरंच पुढे गेल्यावर गर्द झाडी होती. खाली जमिनीवर पानांचा सडा पडला होता. थोडं पुढे हिरवेगार शेत डुलत होते. पाटाचं पाणी झुळझुळ वाहत होतं. तिथे काही घटका विसावा घ्यावा, म्हणून चौघं तिथं थांबली. एका झाडाखाली बसली. मुक्तानं दशम्यांची शिदोरी सोडली, ते बघून सोपान पटकन उठला. आजूबाजूला पडलेल्या पानांच्या ढिगाऱ्यातून त्याने त्यातल्या त्यात कमी वाळलेली पिवळसर झालेली पळसाची पानं गोळा केली. एक धाट घेऊन त्याच्या काड्या काढल्या आणि ती पानं जोडून त्यानं पर्णावली तयार केल्या. त्या पिवळ्या सोनेरी पानांच्या सुबक पर्णावली अतिशय सुंदर दिसत होत्या. निवृत्ती, ज्ञानेश्वर दोघंही सोपानाच्या या कारागिरीकडे कौतुकानं बघत होते. त्यानं लावलेल्या पर्णावलीकडे एकटक बघत निवृत्तीदादा म्हणाला, ‘ज्ञाना! बघितलंस, सोपानानं पर्णावली किती नीटस लावल्या आहेत त्या! ज्ञाना, जसे शब्दाला शब्द नेमके जोडावे लागतात तसंच पानाला पानं जोडताना त्यात नेटकेपणा असावा लागतो. तरच त्यातून सुबक कलाकृती निर्माण होते. तुला उमगलं ना मी काय म्हणतो ते ?

निवृत्तीदादाचं हे बोलणं ऐकून ज्ञानेशाच्या चेहऱ्यावर हास्य पसरलं. सोपानाच्या सुबक कामगिरीकडे तोही एकटक पाहत होता; पण त्या छोट्याशा प्रसंगातून निवृत्तीदादानं किती मोलाचा संदेश सांगितला होता. ज्ञानेशानं हसून मान डोलावली. त्याच्या मनात आलं, ‘खरंच सोपानाला इतक्या सुबक पर्णावली बनवायला कशा बरं येतात? इतक्या नेटक्या पर्णावली बनवायला तर मला आणि निवृत्तीदादालासुद्धा येत नाहीत.’ त्याच्या मनातली ही उत्सुकता त्याला स्वस्थ बसू देईना. मुक्तानं पर्णावलीवर वाढलेल्या दशमीचा घास प्रेमानं सोपानाला भरवत त्यानं तो प्रश्न त्याला विचारलाच, ‘सोपाना, तुला कशा रे इतक्या सुबक पर्णावली बनवता येतात? निवृत्तीदादा, इतक्या सुबक पर्णावली तर आपल्या दोघांनाही येत नाहीत, मग हा कुठून शिकला?’

ज्ञानेशाच्या या बोलण्यावर निवृत्तीदादानं दुजोरा दिला. तो म्हणाला, ‘खरंच रे ज्ञाना, खरंच आपल्याला इतक्या सुबक पर्णावली जोडायला येत नाहीत. सोपाना, कुठं रे शिकलास असं नेटकं काम करायला?’ निवृत्तीदादाच्या या बोलण्यावर सोपाना

उत्तर देणार, तोच मुक्तीनं मध्येच तोंड घातलं. 'निवृत्तीदादा, ज्ञानादादा तुम्हाला दोघांना माहिति आहे का, की ब्राह्ममुहूर्तावर गंगेच्या घाटावर जाऊन नुसती ज्ञानसाधना करणं, म्हणजे ज्ञानार्जन केलं असं होतं नाही. त्यासाठी आईच्या हाताखाली पण थोडं थोडं काम शिकावं लागतं. सोपानदादा तसाच शिकलाय. होय ना रे सोपानदादा?' सोपानानं उत्तर देण्याआधीच मुक्तानं मोठ्या फणकाऱ्यानं उत्तर दिलं. आठ-दहा वर्षांची असेल मुक्ता, पण जशी तिची समजही मोठी होती, तसाच तिचा फणकाराही. तिचा तो फणकारा बघून निवृत्तीला हसूच आलं. ज्ञानेश्वरानं मात्र तिचा कान धरला आणि म्हणाला, 'हो का मुक्ताबाई? आम्हाला नव्हतं माहीत? मग तो पाणीदार भात करायला तुम्ही आईच्या हाताखालीच शिकलात वाटतं?' ज्ञानेश्वरानं त्या प्रसंगाची आठवण करून दिली आणि सगळी खळखळ हसली. कारण, एकदा मुक्तीनं भात म्हणून जे काही केलं होतं, ते पेज म्हणून प्यावं लागलं.

अशा काही गोष्टी करत चौघांची जेवणं चालू होती. मैना, साळुंकी, पोपट, चिमणी, कावळा ही सगळी जण एकेक करून येऊन हे दृश्य डोळे भरून बघून जात होती. वाराही क्षणभर थांबला. त्या चौघांभोवती गोल फिरला. आपल्या चंचल मनाच्या एका कोपऱ्यात हे दृश्य साठवलं आणि पुन्हा वाहायला लागला. सूर्यही क्षणभर झाडामागे विसावला. पानांच्या आडून कवडसे पाडून त्यानंही हे दृश्य मनात साठवलं. पाटातून झुळुझुळु वाहणाऱ्या पाण्यानं एक उसळी मारली. त्या चौघांना आपल्या पारदर्शी नजरेनं न्याहाळलं आणि पुन्हा झुळुझुळु वाहायला लागलं. धरेनं तर त्या लेकरांना बसण्यासाठी पानांच्या रूपानं रजई अंथरून त्यांना आपल्या मांडीवरच बसवलं होतं. आपल्या कवडशातून त्या चौघांना डोळे भरून बघणाऱ्या सूर्याला झाकोळून एक निळासावळा चुकार ढग आकाशाचा प्रतिनिधी बनून आला आणि या चौघांना न्याहाळून लगबगीनं क्षितिजापार गेला. माणसांच्या जगातला अवघा निसर्ग आपले सगळे पाईक बरोबर घेऊन या निरागस लेकरांवर मायेची उधळण करत होता आणि निसर्गाच्या जगातली माणसे मात्र या लेकरांची हेटाळणी करत होती, उपेक्षा करत होती, त्यांचा तिरस्कार करत होती !

मजल दरमजल करीत हे चौघं जण पैठणला पोहोचले. दोन्ही तीरांच्या काठापर्यंत येऊन गोदावरीनं त्यांचं स्वागत केलं. पैठणला विठ्ठलपंतांचं आजोळ होतं. विठ्ठलपंतांचे मामा कृष्णाजीपंत देवकुळे पैठणला राहत असत. त्यांनीही आपल्या या नातवंडांना वाड्यात प्रवेश दिला नाही. मामींनी मात्र मामांच्या विरोधाला न जुमानता गोठ्याजवळची खोली या मुलांना उघडून दिली आणि त्यांची जेवणा-खाण्याची व्यवस्था केली. मामांनी या मुलांना पाहिल्यावर कपाळावर घातलेल्या आठ्या, 'तुमच्या बापानं संन्यासाश्रम सोडून गृहस्थाश्रमात प्रवेश केला, तेव्हाच तो मला मेला. त्यामुळे तुमचा माझा काहीही संबंध नाही' असं त्यांनी सांगणं आणि मामींनी मामांच्या विरोधाला न जुमानता या चौघांवर माया करणं हा सगळा विरोधाभास सोपानाला अस्वस्थ करून गेला.

मामींनी खोली उघडून दिल्यावर चौघं जण आत जाऊन बसली खरी; पण सोपान अस्वस्थच होता. विचारांच्या उलटसुलट आवर्तनानं त्याची कासाविशी आणखी वाढली. ती त्याच्या डोळ्यांत दिसली. चेहऱ्यावर उतरली. हालचालीत जाणवली. निवृत्तीदादाच्या लक्षात आलं. त्याला राहवलं नाही. त्यानं विचारलं, 'सोपाना, काय झालं रे? असा अस्वस्थ का दिसतो आहेस?' दादाचा प्रश्न ऐकून सोपानाच्या डोळ्यांत पाणी तरारलं. 'दादा, माणसांच्या स्वभावातील विरोधाभास बघून मी अस्वस्थ झालो आहे. हे मामाआजोबा आपल्या बाबांचे सख्खे मामा ना? त्यांनीही आपल्या बाबांना समजून घेऊ नये? तेही ठीक आहे; पण आई-बाबांनी प्रायश्चित्त घेतल्यानंतरही त्यांनी आपल्याला-सुद्धा नाकारावं? आपलीच माणसं आपल्याच

माणसांशी असं का वागतात?' सोपानाची कासाविशी त्याच्या शब्दा-शब्दातून प्रतीत होत होती. निवृत्तीदादांना कौतुक वाटलं. 'हा आपला सोपाना बारीकसारीक गोष्टींचा किती विचार करतो आहे,' आणि त्याचबरोबर त्यांना आनंदही झाला, कारण अशाच लहान-लहान विचारांतून अनुभवाचं शिक्षण त्याला मिळणार होतं. 'सोपाना, तुझी कासाविशी मला समजली, पण बाळा, समाजात वावरायचं असेल, तर आपल्या मनाचा कल पाहण्यापेक्षा समाजाच्या मनाचा कौल विचारात घ्यावा लागतो. त्यातच धर्मकर्मकांडाचा विळखा इतका जबरदस्त असतो, की तिथं आपला-परका याचं भान राहत नाही आणि कुठल्याही कार्याला विचाराला, कृतीला आपलीच माणसं प्रथम विरोध करतात आणि मग इतर; पण म्हणूनच चांगलं कार्य करणाऱ्या व्यक्तीला समजुतीनं, विवेकानं आपल्या माणसांचा विरोध मोडून काढणं सोपं जातं.' निवृत्तीदादाच्या या विश्लेषणानं सोपानाचं समाधान झालं; पण पुन्हा त्याच्या डोळ्यांत एक प्रश्न उभा राहिला. 'दादा! हे झालं मामाआजोबांबद्दल; पण मग मामी आजीचं काय?' आजोबांचा विरोध पत्करून तिनं आपल्यावर माया केली. ते कसं काय? सोपानाच्या याही प्रश्नाला निवृत्तीनं उत्तर दिले, 'सोपाना! प्रत्येक स्त्रीमध्ये एक आई, एक माता दडलेली असते. कुठल्याही बालकाला पाहिलं की, तिचं मातृत्व, तिच्या हृदयातलं वात्सल्य जागं होतं आणि मातृत्वासमोर आणि वात्सल्यासमोर जगातले सगळे प्रश्न, सगळे विरोध शरण जातात, समजलं?' आता मात्र सोपानाला खरंच समजलं होतं. त्याच्या हृदयातली कासाविशी, मनातली अस्वस्थता, डोळ्यांतल्या शंका आणि चेहऱ्यावरचे प्रश्न नाहीसे झाले होते आणि त्याची जागा प्रसन्नतेनं घेतली होती.

संध्याकाळ झाली. मामींनी तुळशी वृंदावनाजवळ सांजवात केली आणि त्या आत निघून गेल्या. तुळशीवृंदावनातल्या गोपाळकृष्णाला चौघांनी नमस्कार केला आणि वाडा चौघांच्याही आवाजात उच्चारलेल्या सुस्पष्ट मंत्रोच्चाराने दुमदुमून गेला. ओंकारनाद झाला. गायत्रीचा जप झाला आणि भगवद्गीतेच्या उच्चारणाला सुरुवात झाली !

**धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे धर्मवेता युयुत्सवः।**
**मामकाः पाण्डवाश्चैव किं कुर्वत संजयः।।**

तिघांचे उन्मलित, उत्स्फूर्त स्वर, स्वरोह, आरोह, अवरोह, स्वरघात यांचा कटाक्ष ठेवून त्या वाड्यात निनादू लागले. त्या स्वरांच्या जोडीला मुक्तीचा कोवळा स्वर किणकिण निनादणाऱ्या घंटेप्रमाणे गुंजत होता. गीतोच्चार करताना त्यांनी प्रत्येक वर्ण शुद्ध आणि त्याचे प्रत्येक उदात्त, अनुदात्त आणि स्वरित हे आघात आत्यंतिक उच्चारशुद्धतेनं उच्चारले जात होते. या मंत्रपठणानं अवघा वाडा रोमांचित झाला. भिंती थरारल्या, सारवलेल्या जमिनीवर शुभचिन्हे उमटू लागली. या उच्चारांची ध्वनिस्पंदनं अंगण ओलांडून पडवी, सोपा, माजघर पादाक्रांत करून देवघरापर्यंत जाऊन पोहोचली. ते ध्वनिस्पंदनांचं सिंचन इतकं मंगलमय होतं, की त्यातल्या प्रत्येक स्पंदनातून आपल्यावर पंचामृताचं प्रोक्षण होतं आहे, असं देवघरातील देवांना वाटलं आणि त्या मूर्ती उजळून गेल्या. त्या ध्वनिस्पंदनांतून निर्माण झालेली ऊर्जा देवघरात लावलेल्या समईच्या वातीत शिरली आणि समईतलं तेल संपलं होतं, तरीही वात जळत राहिली. ज्योत उजळत राहिली आणि ज्योतीतून पसरणारा प्रकाश अंगभर लेवून अवघा देव्हारा लख्ख तेजानं उजळून गेला. पडवीतल्या झोपाळ्यावर रामरक्षा म्हणत बसलेले कृष्णाजीपंत हा सगळा प्रकार बघून स्तिमित झाले. आपल्या भाच्याची ही चार लेकरं, म्हणजे दुसरी-तिसरी कोणी नसून प्रत्यक्ष ईश्वराचे अवतार आहेत, याकडे त्यांच्या मनाचा कौल झुकायला लागला; पण तरीही अजूनही कुठेतरी कर्मकांडाचा विळखा त्यांच्या भोवती होताच, तो सुटायला दुसरा दिवस उजाडावा लागला. (क्रमशः)

**– सौ. मंजुश्री गोखले,**
मो. ८८०५३५५२००

# सोपानदेवांची 'अलौकिक सोपानदेवी'

ज्ञानेश्वरांनी श्रीमद्‌भगवद्‌गीतेवरील भाष्य ज्ञानेश्वरीद्वारा लिहून या महान ग्रंथराजाचा सर्वसामान्यांना परिचय करून दिला हे आपण जाणतो. मात्र ज्ञानेश्वरांपाठोपाठ त्यांचे धाकटे बंधू सोपानदेवांनीही अतिशय सोप्या भाषेत गीतेचा ओवीबद्ध अर्थ सांगितला आहे हे किती लोक जाणतात? गीतेच्या ७०० श्लोकांचे निरूपण ज्ञानदेवांनी सुमारे ९०३२ ओव्यांतून केले आहे. तर सोपानदेवांनी ते अवघ्या ७०४ ओव्यांतून आणि नागर मराठी भाषेत केले आहे. नवस्नेहच्या संपादिका सौ. मंजुश्री गोखले यांनी सोपानदेवी संपादित केली असून आपण ती क्रमश: वाचत आहोत. यात ठळक टाईपात सोपानदेवांची रचना असून त्याखाली विनोबांनी केलेली गीताईतील रचना दिली आहे. **– व्यवस्थापक**

**अध्याय ८ : अक्षरब्रह्मयोग**

**म्हणोनी चित्त नेमणे माझ्या ठायी । जे मज ध्याती नित्य पाही । तयासी मी अर्जुना सुलभ होई । योगसुक्त करूनिया ।।**

अनन्य-चित्त जो नित्य स्मरे मज निरंतर ।
सदा मिसळला योगी तो सुखे मज पावतो ।।१४।।

**योगयुक्त जै भजिजे । मग दु:खरूप हा जन्म नाही सहज । ऐसे महात्म्य याचे चोज । ते परम सिद्धि पावले ।।**

पावले मोक्ष-सिद्धीस महात्मे मज भेटुनी ।
दु:खाचे घर तो जन्म न घेती चि अशाश्वत ।।१५।।

**जे आहेती ब्रह्मलोक आदि करून ।**
**तया असे मागुता जन्म ।**
**मज पावलिया अर्जुना जाण । पुनरावृत्ति नाहीं ।**

ब्रह्मादि लोक ते सारे माघारे घालिती पुन्हां ।
माझी भेट घडे तेव्हां जन्मणें मग खुंटलें ।।१६।।

**सहस्त्रयुगपर्यंत । ब्रह्मयाचा एक दिवस होत । तैसा रात्रीचा संकेत । हे अहोरात्र ज्ञानी जाणती ।।**

होतसे ब्रह्म-देवाचा सहस्त्र-युग तो दिन ।
तेवढी चि तशी रात्र कालोपासक जाणती ।।१७।।

**अव्यक्त जे असती । ते ब्रह्म दिवशी व्यक्ति येती।**
**रात्री जालिया प्रळय पावती ।**
**अव्यक्ताच्या ठायी ।।**

अव्यक्तापासुनी होती भूतें व्यक्त दिनोदयीं ।
रात्र होतां लया जाती सगळीं मग त्यांत चि ।।१८।।

**हे पंचभूताचि सृष्टी । हे लपजे पुढत पुढती ।**
**नाश पावे ब्रह्मदेवाचिये राती ।**
**पुनरपी दिवसा उत्पत्ती होय ।।**

ती चि ती चि पुन्हां भुतें त्यांचे काही न चालतां ।
दिनांती मरती सारी उदयी जन्म पावती ।।१९।।


**या पासाव वेगळा असे ईश्वरु ।**
**अव्यक्त नित्य असे पा स्थिरु ।**
**सर्व भुतांचा होय संहारू । परी या रूपा नाश नाही ।।**

अव्यक्त दुसरें तत्व त्या अव्यक्तापलीकडे ।
नाशतां सगळी भूते न नाशे जे सनातन ।।२०।।


**वाचकांनी आपले बदललेले पत्ते चित्पावन संघाच्या कार्यालयात किंवा ७६२०५४६२२५ या व्हॉटस् ॲप क्रमांकावर लौकरात लौकर पाठवावेत. तसेच ज्यांना नवस्नेहचा अंक मिळाला नसेल त्यांनी संघ कार्यालयात कळवावे. त्यांना अंकाची पीडीएफ व्हॉटस्ॲपवर पाठविली जाईल.**




## » चित्र रंगवा



## » फरक ओळखा



## » ठिपके जोडून चित्र तयार करा



# भारतरत्न महामहोपाध्याय

महामहोपाध्याय डॉ. पांडुरंग वामन काणे यांचा जन्म पेढे परशुराम, ता. चिपळूण, जि.रत्नागिरी येथे ७ मे १८८० रोजी झाला. ते भारतातील एक उल्लेखनीय भारतशास्त्रज्ञ, संस्कृत विद्वान, भारतीय कायदेपंडित आणि धर्मशास्त्राचे अभ्यासक होते. १९६३ मध्ये त्यांना भारताचा सर्वोच्च नागरी पुरस्कार भारतरत्न प्राप्त झाला. त्यांचे अभ्यासपूर्ण कार्य आणि ४० वर्षांपेक्षा जास्त वर्ष सक्रिय शैक्षणिक संशोधन यांमधून धर्मशास्त्राच्या इतिहासाच्या ६,५०० पृष्ठांचे इतिहास लेखन झाले. इतिहासकार राम शरण शर्मा म्हणतात पांडुरंग वामन काणे, एक महान संस्कृतशास्त्रज्ञ होते, ज्यानी सामाजिक सुधारणेचा पुरस्कार केला, विद्वत्तेची पूर्वीची परंपरा चालू ठेवली. विसाव्या शतकात पाच खंडांमध्ये प्रकाशित धर्मशास्त्राचा इतिहास हे त्यांचे स्मारक कार्य आहे. प्राचीन सामाजिक कायदे आणि रीतिरिवाजांचा ज्ञानकोश हे आपल्याला प्राचीन भारतातील सामाजिक प्रक्रियांचा अभ्यास करण्यास सक्षम आहे. पांडुरंग वामन काणे यांच्या पन्नासाव्या स्मृतिदिना-निमित्त राजभवन महाराष्ट्र येथे महाराष्ट्र राज्याचे राज्यपाल भगतसिंह कोश्यारी यांच्या हस्ते त्यांच्या टपाल तिकिटाचे प्रकाशन झाले.

कोकणातील वेदशास्त्रपारंगत व विद्वत्तेची मोठी परंपरा असलेल्या अशा मध्यमवर्गीय कुटुंबात काणे यांचा जन्म झाला. त्यांचे पणजोबा उत्तम ज्योतिषी आणि पंचांगकर्ते, तर आजोबा वैदिक पंडित, ज्योतिषी आणि उत्तम वैद्य होते. वडील वामनरावांना वेद, उपनिषदे, भगवद्गीता यांचे सखोल ज्ञान होते. महत्त्वाचा असा ऋग्वेद तर त्यांचा तोंडपाठ होता. वामनराव पुढे वकिलीची परीक्षा उत्तीर्ण होऊन, न्यायालयात इंग्रजीतून कामकाज करणारे पहिलेच वकील ठरले. म्हणजे परंपरागत भारतीय ज्ञान आणि आधुनिक इंग्रजी भाषेतील कायद्याचे ज्ञान असा मिलाफ असलेले असे त्यांचे वडील वामनराव! डॉ. पां. वा. काणे यांचे दुसरे आजोबा म्हणजे आईचे वडीलही वैदिक पंडित आणि वैद्यकीचे उत्तम ज्ञान असलेले असे होते.

पां.वा. काणे यांना अमरकोशातील सर्व श्लोक लहानपणीच तोंडपाठ होते. लहान वयातच त्यांनी विविध नियतकालिकांतून आधी मराठीतून आणि नंतर इंग्रजीतून लेखन सुरू केले. त्यांच्या ज्ञान आणि विद्वत्तेचा आलेख सतत वरच चढत गेला. बी.ए. आणि संस्कृतमधून एम.ए. करतानाच त्यांनी अनेक विषयांमध्ये संशोधन सुरू केले. संस्कृत, मराठी, हिंदी, इंग्रजी या भाषांबरोबरच त्यांनी फ्रेंच आणि जर्मनसह अनेक भाषांवर प्रभुत्व मिळवले. अश्या रीतीने त्यांनी अतिशय मेहनतीने स्कॉलरशिप मिळवत आणि एकीकडे शिकवत राहून खूप विद्या संपादन केली. संस्कृत भाषेवर अतिशय प्रेम, त्यामुळे बी.ए.ला संस्कृतमध्ये ते सर्वप्रथम आले. त्याबद्दल त्यांना भाऊ दाजी पारितोषिक मिळाले. मग एल एल.बी. झाले. नंतर वेदान्त पारितोषिकासह ते मुंबईच्या विल्सन महाविद्यालय येथून एम.ए. झाले. त्यानंतर 'हिंदू-मुसलमान कायदा' घेऊन एल एल.एम. झाले. या परीक्षेत त्यांना व्ही.एन. मंडलिक सुवर्णपदक मिळाले. त्यांना मराठी, हिंदी, इंग्रजी खेरीज संस्कृत, जर्मन, फ्रेंच इ. भाषा अवगत होत्या.

काणेंनी १९०४ साली रत्नागिरी जिल्ह्यातील एका शाळेत शिक्षक म्हणून कामास सुरुवात केली. नंतर ते एल्फिन्स्टन हायस्कूल, मुंबई येथे नोकरीवर होते. मुंबईच्याच गव्हर्नमेंट लॉ कॉलेजमध्येसुद्धा त्यांनी शिकवले होते. मुंबई विद्यापीठाचे ते सन १९४७ ते १९४९ दरम्यान कुलगुरू होते.

प्राचीन संस्कृत वाङ्मयाचा अभ्यास, सामाजिक अभिसरणाचे भान या दोन अगदी वेगळ्या वाटणाऱ्या गोष्टींमधून काण्यांनी 'धर्मशास्त्राचा पंचखंडात्मक इतिहास' नावाचा ग्रंथ सिद्ध केला. १९४१ साली त्यांनी प्राच्यविद्येवरचा ग्रंथ लिहिला. १९४२ साली

त्यांना ‘महामहोपाध्याय’ ही पदवी मिळाली. ‘हिस्टरी ऑफ संस्कृत पोएटिक्स’ हासुद्धा त्यांचा अजून एक महत्त्वाचा ग्रंथ. भारतरामायणकालीन समाजस्थिति (१९११) आणि धर्मशास्त्रविचार (१९३५) हे ग्रंथ त्यांच्या महत्त्वाच्या मराठी ग्रंथांपैकी होत. प्राचीन भाषा, वाङ्मय, काव्य, महाकाव्य, अलंकारशास्त्र यांचे प्रेम आणि कायदेविषयक जाण, तार्किक मांडणी, प्रथा आणि परंपरांचा कालानुरूप अर्थ लावण्याची क्षमता या आणि अशा शेकडो पैलूंचे एक विस्मयकारी मिश्रण पांडुरंगशास्त्रींच्या लेखनात झाले. खगोलविद्या, सांख्य, योग, तंत्र,पुराणे आणि मीमांसा या विषयांचा सखोल अभ्यास करून त्यांनी त्यांवर भाष्य लिहिले. त्यांचे हे प्रकांड पांडित्य, हा साक्षेपी व्यासंग, ही तैलबुद्धी आणि सखोल संशोधनाची आस पुढील कित्येक पिढ्यांपर्यंत झिरपली गेली.

प्राचीन ज्योतिषशास्त्र, खगोलविद्या, योगशास्त्र, पुराणे, टीका आणि मीमांसा, सांख्य तत्त्वज्ञान, महाराष्ट्राचा सांस्कृतिक इतिहास, कौटिल्याचे अर्थशास्त्र, गणित, धर्मशास्त्र, मराठी भाषेचा सर्वांगीण अभ्यास, काव्यशास्त्र, नाट्यशास्त्र, अशा असंख्य विषयांवर त्यांनी सुमारे ४० ग्रंथ, ११५ लेख, ४४ पुस्तक परिचय/परीक्षणे लिहिली आहेत. यावरून त्यांच्या ज्ञानाचा आवाका आणि प्रचंड विस्तार लक्षात येतो.

ब्रिटिशांनी येथे आपले बस्तान बळकट करतांनाच येथील संस्कृती, विद्या, ग्रंथ, प्रथा, समाज, रूढी यांची कुचेष्टा सुरू केली. मिशनऱ्यांनी हिंदू धर्माची विविधांगी टिंगल सुरू केली. त्यांमध्ये त्यांनी येथील काही तथाकथित विद्वानांनाही सामील करून घेतले. इंग्रजीतील एखादी कविता ही संपूर्ण संस्कृत काव्यापेक्षा श्रेष्ठ आहे, असे अत्यंत उर्मट उद्गार, मेकॉलेसारख्या अधिकाऱ्याने काढले होते. लॉर्ड कर्झनने तर भारतीयांना सत्य म्हणजे काय याची कल्पनाच नसल्याची दर्पोक्ती केली होती. डॉ.काणे या सर्व गोष्टींनी व्यथित झाले होते. १९२६ मध्ये त्यांनी व्यवहारमयूर हा ग्रंथ प्रसिद्ध केला. त्यावेळी केलेला अभ्यास, जमविलेली कागदपत्रे आणि अन्य साधने, आजवरचे धर्म आणि कायदा यांचे ज्ञान अशा भक्कम तयारीनिशी त्यांनी भारतीय धर्मशास्त्राचा इतिहास लिहिण्यास सुरुवात केली. इंग्रज आणि इतर युरोपीय देशांना कळावे म्हणून त्यांनी हा परिपूर्ण इतिहास इंग्रजीत लिहिला. सुमारे ७००० पाने आणि ५ खंडांमध्ये त्यांनी लिहिलेला हा इतिहास आजही जागतिक पातळीवर अचूक आणि प्रमाण म्हणून मानला जातो.

**समाजसुधारणा आणि संस्थांमध्ये कार्य**

समाजसुधारणा आणि पुरोगामी विचारांचा पुरस्कार सुद्धा डॉ. काणेंची वैशिष्ट्ये होती.भारतीय कायदे आणि रुढींचा अभ्यास असलेल्या डॉ. काणेंनी तत्कालीन अनिष्ट चालींविरुद्ध आवाज उठवला होता.विधवांना केस कापून टाकण्याची सक्ती करणे, अस्पृश्यता यांसारख्या रूढींना त्यांनी तीव्र विरोध केला. एका केस न काढलेल्या विधवेला पंढरपुरात विठ्ठलाची पूजा करण्याचा अधिकार मिळावा यासाठी त्यांनी तिचे वकीलपत्र घेतले होते.आंतरजातीय विवाह, विधवाविवाह तसेच घटस्फोटाचा अधिकार याचाही त्यांनी पुरस्कार केला. पण वकिली आणि शिक्षणक्षेत्रात सक्रिय असणाऱ्या काणेंनी प्रत्यक्ष राजकारणात सहभाग घेतला नाही. सन १९५३ ते १९५९ या काळात पां.वा. काण्यांची राज्यसभेवर नियुक्ती झाली होती.

पां.वा. काणे यांना १९४६ साली अलाहाबाद विद्यापीठाने सन्माननीय डॉक्टरेट बहाल केली.तसेच १९६० साली पुणे विद्यापीठाने सुद्धा सन्माननीय डॉक्टरेट बहाल केली.काणे यांनी धर्मशास्त्राचा इतिहास मराठीत लिहून काढला. या कामाबद्दल त्यांना १९५२ साली नॅशनल प्रोफेसर हा पुरस्कार देण्यात आला.ते राष्ट्रपतींनी निवडलेले असे राज्यसभेचे खासदार झाले.काणे यांना १९६३ साली भारतरत्न हा पुरस्कार प्रदान करण्यात आला. ‘हिस्ट्री ऑफ धर्मशास्त्र’च्या पाच खंडांपैकी चौथ्या खंडाला १९६५ मध्ये साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला.डॉ.काणे मुंबईच्या एशियाटिक सोसायटीचे

फेलो होते.भांडारकर प्राच्यविद्या संशोधन मंदिराच्या नियामक मंडळावर त्यांनी काम केले. 'महाराष्ट्र साहित्य परिषदेचे' उपाध्यक्ष म्हणून त्यांनी काही काळ काम केले. 'लंडन स्कूल ऑफ ओरिएंटल अँड आफ्रिकन स्टडीज' या संस्थेने त्यांना फेलोशिप दिली. त्यांचा मृत्यू १८ एप्रिल १९७२ रोजी झाला

**– विकास मेहंदळे,**

मोबा. ९४२०१५५११४

---

## मी सायकलवरून केलेली देवभूमीतील चारधाम यात्रा !

जेवण दिले.

संध्याकाळी पाच वाजता बोरगावमध्ये पोहोचलो. पाऊस पडणार असल्यामुळे तेथेच एका मंदिरात आसरा मिळवला. थोड्याच वेळात पाऊस पडला. मंदिरातील पुजारी यांनी मला राहण्यासाठी एक अडगळीची खोली दाखवली. खोलीमध्ये अस्वच्छता आणि पसारा होता. तरीसुद्धा पर्याय नसल्यामुळे मी तिथेच राहिलो. तेथील महाराजांचा व्यवहार तितकासा आपुलकीचा नव्हता हे लक्षात आल्यामुळे रात्री भोजन भिक्षा मागितली नाही. माझ्याकडे असलेला एक लाडू खाल्ला व पाणी पिऊन झोपी गेलो.

गाढ झोप लागली पण मध्येच लाईट गेल्यामुळे चालू असलेला पंखा बंद झाला व गरम होऊ लागल्यामुळे जाग आली. उठून लाईट येण्याची वाट पाहू लागलो. थोड्याच वेळात लाईट आली. मी पुन्हा खोलीमध्ये येऊन दरवाजा लावला, पण दरवाजा नीट लावता आला नाही. याचे कारण माझ्या लक्षात येईपर्यंत उशीर झाला होता व दरवाज्याच्या बिजागरीमध्ये एक मध्यम आकाराचा सर्प चिरडून मेल्याचे दिसले. मी पण मनातून घाबरलो व मंदिरातील महाराजांना बोलावले. त्यांनी येऊन परिस्थिती पाहिली. पण तरीही त्यांनी मला आपल्या खोलीमध्ये न राहायला देता तिथेच झोपावयास सांगितले. मी दरवाजा बंद केला व पर्याय नसल्यामुळे तिथेच बसून राहिलो. झोप लागणे दुरापास्त होते. त्यामुळे रामरक्षा, हनुमान चालीसा, भीमरूपी, नर्मदा अष्टक, अथर्वशीर्ष अशी जी येतील ती स्तोत्रे म्हणत बसलो. थोड्या वेळाने पुन्हा लाईट गेले. आता मात्र माझा तिथून निघण्याचा निश्चय झाला. कारण अंधारामध्ये अन्य काही जनावर तिथे आले तर मला समजणार नाही. म्हणून रात्री दहा वाजता मी सायकलवर पुन्हा सामान बांधले व महाराजांना सांगून पुढे जाण्यासाठी निघालो.


**– ओंकार गाडगीळ**

मोबा. ९८२२८७६९२२

---

**दिनविशेष (फेब्रुवारी २०२६) विश्वावसूनाम संवत्सरे** **सौजन्य : श्री महालक्ष्मी दिनदर्शिका**

**माघ-फाल्गुन १९४७** **श्री महालक्ष्मी दिनदर्शिका जिथे जिथे । साक्षात लक्ष्मी वसे तिथे ।**



**सोमवार दि. २ :** गुरुप्रतिपदा, संत निवृत्तीनाथ जयंती, **गुरुवार दि. ५ :** संकष्ट चतुर्थी (चंद्रो. ९.४२ वा.), **शुक्रवार दि. ६ :** औदुंबर पंचमी, श्रीकृष्ण सरस्वती महा.जयंती, **रविवार दि. ८ :** गजानन महाराज प्रकट दिन, जोतिबा खेटे प्रारंभ, **बुधवार दि. ९ :** रामदास नवमी, **रविवार दि. १५ :** महाशिवरात्री, संत गाडगेबाबा जयंती, **सोमवार दि. १६ :** सोमवती अमावास्या, **गुरुवार दि. १९ :** छत्रपती शिवाजी महाराज जयंती, **शनिवार दि. २१ :** जागतिक मातृभाषा दिन, **मंगळवार दि. २४ :** जागतिक मुद्रण दिन, **गुरुवार दि. २६ :** स्वा.सावरकर पुण्यदिन, **शुक्रवार दि. २७ :** मराठी भाषा गौरव दिन, **शनिवार दि. २८ :** राष्ट्रीय विज्ञान दिन.

# मोबाईल
# मनाला खुपणारं कागदावर

**(लेखांक ५)**

१९५० ते १९६० च्या दशकात विज्ञानाची प्रचंड वेगाने घोडदौड सुरू झाली. त्यामुळे या कालावधीत 'विज्ञान शाप-की वरदान?' या विषयावर वक्तृत्व स्पर्धा, निबंध स्पर्धा घेतल्या जात होत्या. कालौघात त्या थांबल्याही. विज्ञानाची ही वायूवेगाने होणारी घोडदौड चालूच आहे. मोबाईल नंतर आता ए.आय. (कृत्रिम बुद्धिमत्ता) चा जमाना सुरू झाला आहे. कोणतही गोष्ट, कोणतेही साधन शाप की वरदान ठरणार हे वापरकर्त्यावर अवलंबून असते. याच्या आगमनाने लँडलाईनचा जमाना मागे पडला. विविध रूपात आणि विविध प्रकारात हा सहजासहजी उपलब्ध होतो. पुस्तक विकत घेण्यासाठी पैसे न घालता संपूर्ण पुस्तक-ऑडिओ बुक-तुम्ही तुमच्या सवडीने यावर वाचू शकता --- खिशातून, पर्समधून किंवा अगदी हातातूनही मोबाईल फोन आपण आपल्याबरोबर कुठेही नेऊ शकतो. घरात बसून सभा घेणे, एकमेकांना समक्ष पहात चर्चा करणे, गप्पा मारणे, फोटो काढणे, कार्यक्रमाचे चित्रण करणे अशा मोबाईलद्वारे करता येणाऱ्या असंख्य गोष्टींची यादी देता येईल. साता समुद्रापार, परदेशांत असणाऱ्या व्यक्तीलाही समक्ष पहात आपण संवाद साधू शकतो. रेल्वे, बस, विमान यांचे आरक्षणही याद्वारे काही मिनिटांत होऊ शकते. हा पैशाची देवाण-घेवाणही करतो. याच्यामुळे मिळणाऱ्या सुविधा आणि होणारी कामं ही कधीही न संपणारी गोष्ट आहे.

या धावपळीच्या आयुष्यात मोबाईल हे निश्चितच मानवासाठी वरदान आहे. कोणतेही साधन योग्य प्रकारे वापरले तर ते कल्याणकारी वरदानच असते. तसेच मोबाईल योग्य कामासाठी मर्यादित वेळेत वापरला गेला पाहिजे. अनेकजण व्यसनाधीनतेप्रमाणे मोबाईलचा वापर करतात. अणुऊर्जेचा वापर मानवी कल्याणासाठी करता येतो, तसाच या ऊर्जेचा वापर मानवी जीवन बेचिराख करण्यासाठीही करता येतो. राजाच्या नाकावर बसणारी माशी मारण्यासाठी माकडाने तलवारीचा उपयोग केल्याने त्याचे नाकच कापले गेले हा दोष तलवारीचा निश्चितच नाही. तू ज्याच्या डोक्यावर हात ठेवशील त्याचे क्षणात भस्म होईल असे वरदान भस्मासुराला मिळाले होते. पण मनावरचा संयम सुटला, मोहाला बळी पडला आणि स्वत:च्या डोक्यावर हात ठेवून भस्म झाला. वरदानाचं शापात रूपांतर झालं. म्हणजे वस्तू तुम्ही कशी वापरता यावर सारं काही अवलंबून आहे.

हवा, पाणी, अन्न, वस्त्र, निवारा याप्रमाणे आज मोबाईल जीवनावश्यक बाब झाली आहे. मोबाईल घेऊन दिला नाही म्हणून आत्महत्या करण्यापर्यंत मजल जाते. अगदी १०-१२ हजार रुपये महिना नोकरी लागली तरी पहिला पगार मिळताच मालकाकडे पुढील पगार ॲडव्हान्स देण्याची विनंती करत भारीतला मोबाईल घेण्याकडे अनेकांचा कल असतो याचे आश्चर्य वाटते. खरं तर गुगल, युट्युब इ. मोबाईलवर असणारे ज्ञानाचे झरे, ज्ञानाचे भांडार असतात असे म्हटल्याच चुकू नये. कोणत्याही क्षेत्रातील ज्ञानाचे दालन उघडून माहितीचा खजिना काही क्षणांत मोबाईल आपल्या हाती देतो, पण या भांडारातील फक्त चांगले घेण्याचे प्रत्येकाला समजतेच असे नाही. नको त्या वयांत नको त्या गोष्टींचं ज्ञान घेऊन अत्याचारी आणि गुन्हेगारी जगताकडे वळलेली अल्पवयीन मुले आपण आज पाहतो, जी बहुतेकवेळा मोबाईलचे बळी ठरलेही असतात.

देशांत, परदेशांत दिवसा-रात्री केव्हाही संपर्काचे साधन ठरलेला हा मोबाईल जवळच्या व्यक्तीशी प्रत्यक्ष संवाद साधण्यासाठीचा मोठा अडसर बनला आहे. रात्रीच्या झोपेमुळे कांही तासांचा मोबाईलचा झालेला विरह दूर करण्यासाठी पहिला चहा घेण्याआधी 'आधी वंदू तुज सखया' म्हणत प्रत्येकजण, अगदी घरांतील गृहिणीसुद्धा, नतमस्तक होऊन मोबाईलवरचे संदेश वाचण्यात गढून जात असतो. सकाळचा चहा घेताना चुकून सगळेजण जेवणाच्या टेबलाशी एकत्र आले तरी कुणी कुणाशीही बोलत नाही. प्रत्येकजण खाली मान घालून आपला मोबाईल पाहण्यात गर्क असतो. हे पाहून घरांतील वडिल माणसे चटकन् बोलतात, 'अरे, चहा तरी लक्ष देऊन एकमेकांशी बोलत प्या. उठल्यापासून मोबाईलमध्ये कसलं डोके घालून बसता रे?'

यावर उत्तरामागून उत्तरं मिळतात, 'एकदा वर्क फ्रॉम होम सुरू झालं की रात्रीपर्यंत मोबाईल बघायला वेळ कुठं असतो?' 'नाश्ता, स्वयंपाक, डबे यामागे लागलं की सकाळी ११ च्या आत मोबाईल बघायला कुठं वेळ मिळतो सांगा ना?' तरी बरं स्वयंपाकाच्या ओट्यावर मोबाईल ठेवून अनेक गोष्टी ऐकणं आणि बोलणं सुरूच असतं.

'कॉलेजमध्ये फक्त सुटीत किंवा दोन लेक्चर्सच्या मधल्या दोन-चार मिनिटात मोबाईल बघता येतो. म्हणून तर आता बघतोय ना?' असे संवाद-प्रतिसंवाद घराघरांत ऐकायला मिळतात. मग रोज मरे त्याला कोण रडे? या न्यायानं वडील माणसंही शांत राहणं, न बोलणं पसंत करतात.

घरांतील तरुण मुलं तर मोबाईल पहात असतात किंवा मोबाईलवर बोलत असतात. त्यांना काही विचारायला गेलं तर – 'थांब जरा, मी आता मोबाईलवर बोलतोय. थोड्या वेळाने सांगतो.' असं उत्तर मिळतं आणि तो थोडा वेळ कधी येईल सांगता येत नाही.

एकटं फिरायला गेल्यानंतर आजूबाजूचा परिसर पाहणे किंवा ओळखीचं कोणी भेटल्यानंतर त्याच्याशी चार शब्द बोलणे यापेक्षा कानाला इअर फोन आणि खिशांत मोबाईल ठेवून मोकळ्या हाताने फोनवर बोलणारे लोक आज काल खूप भेटतात. काही काळापूर्वी हे लोक असे आपल्याशीच काय बोलतात असं कोडं पडायचं, पण त्या कोड्याचं उत्तर मोबाईलआहे हे समजल्यावर बरं वाटलं. स्कूटर चालवताना वाकडी मान करून कानशिलाखाली खांद्यावर ठेवलेल्या मोबाईलवर बोलणारे महाभागही आढळतात.

स्वागत समारंभ किंवा तत्सम कार्यक्रमाला गेल्यानंतर आपलं ताट वाढून घेऊन जेवायला येऊन बसल्यानंतर लहान मुलांना जेवायला घालण्याचं काम अत्यंत सुकर करणाऱ्या मोबाईलचं कौतुक करावं तेवढं थोडंच असा विचार करायला लावणारे पाच-सहा प्रसंग मी पाहिले. तीन-चार वर्षाचं मूल, हातातला मोबाईल पाहण्यात गर्क. आईनं घास तोंडाशी नेला की विनातक्रार तोंड उघडून जेवणार. एरवी या वयाची मुलं मला हे नको, हे मी खाणार नाही, मला ती भाजी नको इ.इ. तक्रारी करतात. पण हातातील मोबाईल पाहताना ही मुलं यंत्रवत जेवताना पाहून मी खरं तर सुन्न झाले. जेवणाकडे लक्ष देऊन चवीने, सावकाश जेवावं हे तत्त्वज्ञान मोबाईलच्या यु ट्युब, फेसबुक, गेमस् इ. चॅनलमध्ये कधीचंच लुप्त झालं आहे. एकदा काहीसं धाडस करून हातात मोबाईल घेऊन तो एकाग्र होऊन पहात आईकडून घास घेणाऱ्या एका छोट्या मुलाच्या आईला मी विचारलं, 'तुम्ही आज बाहेर जेवत आहात म्हणून तुमचा हा छोटा मुलगा मोबाईल पाहतो आहे का?' यावर त्या उत्तरल्या, 'नाही, घरातही जेवताना त्याला मोबाईल लागतोच. त्याचा तो कार्टून, सोप्या गेमस् लावून मोबाईल पाहू शकतो.' यापुढे आणखी कौतुकाने त्या बाई म्हणाल्या, 'रात्री झोपतानाही तो मोबाईल पहातच झोपी जातो. ' हे ऐकून खरं तर मी सुन्न झाले. शांत आणि स्वस्थ झोप येण्यासाठी काही

वेळ आधी टी.व्ही. किंवा मोबाईलचा स्क्रीन पाहू नका – असं सांगितलं जातं. इथं तर हा छोटा मुलगा स्क्रीन पाहात झोपतो !

दोष कुणाला द्यायचा? अनेक घरांत पालकच खूप वेळा मोबाईल पहात असतात. मग कोणत्या तोंडानं ते आपल्या तरुण मुलांना मोबाईल फार वेळ पाहू नको म्हणून सांगणार? अनेक वेळा तर जागतिक घडामोडी आणि बातम्या पाहण्यासाठी टी.व्ही. लावला जातो, पण टी.व्ही. लक्ष देऊन पाहण्याऐवजी खाली मान घालून डोळे मोबाईलच्या स्क्रीनवरच खिळलेले असतात. मोबाईलच्या अती आणि अयोग्य वापरामुळे तरुणाईत येणारा चिडचिडेपणा, अस्वस्थता आणि एकलकोंडेपणा निश्चितच चिंताजनक आहे. यादृष्टीने काही देशांत योग्य पावले उचलली जात आहेत. ऑस्ट्रेलिया मध्ये १६ वर्षांखालील मुलामुलींना फेसबुक, इन्स्टाग्राम, यु ट्युब, टिकटॉक इ. च्या वापरावर बंदी करणारा कायदा नुकताच केला आहे.

एखादा मेसेज, संदेश कोणी टाकला तर तो काही क्षणात लाखो लोकांपर्यंत मोबाईलमार्फत पोचतो. कधीकधी यामुळे गुप्ततेचा भंग होतो. यादृष्टीने भारतातही सेनेतील अधिकारी आणि जवान इन्स्टाग्रामवर खाते उघडू शकतील, पण इन्स्टाग्रामवर ते कोणतीही पोस्ट टाकू शकणार नाहीत. तसेच इनस्टाग्रामवरील कोणत्याही पोस्टवर आपले मत नोंदविता येणार नाही – असे बंधन नुकतेच घातले आहे.

सर्व गोष्टी कायद्यानं कधीच साध्य होत नाहीत. कायद्यातून पळवाटा शोधणारे कावेबाज आणि तल्लख मेंदूचे लोक असतातच. संगणक युगात आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या युगात जन्मलेली मुलं कोणत्याही प्रगत साधनामागचं तंत्र आणि मंत्र लगेच आत्मसात करतात. आई किंवा बाबांच्या नकळत त्यांचा स्मार्टफोन ५-१० मिनिटांसाठी घेऊन त्यांना पाहिजे ते ज्ञान (?) मिळवतात. हा फोन लपवून नेता येतो आणि कुठेही कोपऱ्यात बसून पाहता येतो. आपल्या बोलण्याचा त्रास इतरांना होऊ नये, या सदहेतूने एखादी व्यक्ती इतरांपासून दूर जाऊन बोलत राहते. यामुळे संशयाची भावना निर्माण होते. हा संशय बघताबघता उग्र रूप धारण करतो. यातून बहुतेक वेळा पती-पत्नीमध्ये काडीमोड घेण्यापर्यंत मजल जाते. काही वेळा तर संशयामुळे संबंधित व्यक्तीची हत्या केली जाते. ए.आय. आणि रील्सच्या प्रवेशामुळे प्रत्येकानी मोबाईलचा वापर खूप काळजीपूर्वक केला पाहिजे.

दैनंदिन आयुष्यात मनाला वेदना देणाऱ्या, मनाला खटकणाऱ्या घटना घडू नयेत यासाठी प्रत्येकाने विशेषत: वाढत्या वयातील मुले घरी असणाऱ्या पालकांनी स्वत: मोबाईलचा वापर फक्त अत्यावश्यक गरजेसाठी आणि कमी वेळासाठी केला पाहिजे. या साऱ्या खटकणाऱ्या घटनांपासून दूर राहण्यासाठी मनाला गरज आहे ती फक्त आणि फक्त संयमाची !

**– कमल हर्डीकर,**
मोबा. ९६८९३६९९२६, ९४२०४५८४२५

**कोल्हापूर चित्पावन संघासाठी आपल्या ठेवीची/वर्गणीची रक्कम**
**युनियन बँक ऑफ इंडिया,**
**महाद्वार रोड शाखा**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 641002050000001)**
**IFSC Code : UBIN0564109**
**येथे पाठवा व KYC पाठवा. किंवा**
**बँक ऑफ इंडिया, शाखा : महाद्वार रोड,**
खात्याचे नाव
**कोल्हापूर चित्पावन संघ**
**(खाते क्र. 090210110016181)**
**IFSC Code : BKID0000902**
**येथे रक्कम पाठवून KYC पाठवा.**

# पुण्यातील राहूल थिएटरचे चंदूशेठ !

पुण्याच्या बारामती तालुक्यात ढाकाळे म्हणून एक गाव आहे. हे गाव दुष्काळी म्हणून पंचक्रोशीत प्रसिद्ध होते. नीरा कालवा आल्यानंतर ही मंडळी पणदरे, माळेगाव भागात रहायला आली. इथेच स्थायिक झाली. हा पट्टा धनगर वस्तीचा आहे.

चंदू शेठ जगताप हे धनगर होते. ते रोजंदारीवर कामाला होते. पुढे ठेका घ्यायला लागले. त्यातून मोठा व्यवसाय उभारला. पणदऱ्यात त्यांनी भला मोठा वाडा बांधला. त्या काळातले या भागातले सर्वात श्रीमंत प्रस्थ म्हणून ते उदयास आले. दिवाळीला हत्तीवरून साखर वाटली जायची. महार मांग वस्तीत फराळ वाटायचे.

त्यांचे सोबती कोकरे वगैरे सुद्धा आर्थिकदृष्ट्या संपन्न झाले. मात्र जगतापांइतके बलाढ्य कुणीच नव्हते. त्यांच्याशी सोयरीक करण्यासाठी वजनदार असामी धडपडत असत. त्यांचे अनेक सांगीवांगीचे किस्से प्रसिद्ध आहेत.

पैसे तिजोरीत किंवा बँकेत न ठेवता पोत्यात भरून तळघरात पोतं फेकत असत. तळघरात अशी कित्येक पोती होती ज्याची मोजदाद सुद्धा केलेली नव्हती. ( त्या काळी नोटबंदी झाली असती तर ?)

त्यांचा नातू पुण्यात शिकायला होता. त्या वेळच्या हिंदविजय (नंतरचे नटराज) सिनेमाला दिलीपकुमारचा सिनेमा सुरू होता. हाऊसफुल्ल शो होता. याने बुकींग क्लर्कला त्या वेळची शंभराची नोट देऊ केली आणि तिकीट द्याच असे म्हणाला. बुकींग क्लर्क पक्का पुणेकर होता. तो म्हणाला  एव्हढा पैसा असेल तर बापाला जाऊन सांग थेटर बांधायला.

त्याने घरी येऊन सांगितले. आज्ज्याने ऐकले. आज्जा म्हणाला माझ्या नातवाला दीडदमडीचा कारकुंड्या बोलला? मी अस्सं थिएटर बांधीन की आख्ख्या पुण्यात तसं नसेल.

आज्जा तडक पुण्यात आला. त्या वेळी गणेशखिंड रस्त्याला एका जागेचा लिलाव चालू होता. आज्जाने पाहिलं. पाच हजार पर्यंत रक्कम वाढली होती. त्या वेळी पाच हजार ही खूपच मोठी रक्कम होती.

आज्जा म्हणजे चंदू शेठ जगताप आपले धनगराच्या वेषात होते. डोक्याला मुंडासं, कोपरी वर घोंगडी, धोतर आणि वहाणा. हे आपले तिथे जाऊन म्हणाले 'पाच लाख'. सगळेच स्तब्ध झाले. गणेशखिंड रस्त्याला पाच लाख बोली कुणी लावण्याच्या मानसिकतेत नव्हते आणि तेव्हढी आवश्यकताही नव्हती.

आयोजक म्हणाले, 'बाबा, पाच लाख म्हणजे किती समजतंय का? पैसे आहेत का एव्हढे तुमच्या जवळ?'

आज्जाने पोलीस अधिकाऱ्याकडे गाडीची चावी दिली आणि म्हणाला, 'बाहेर माझी कार उभी आहे. तिच्यात डिकीत आणि मागच्या सीटवर पोती आहेत. घेऊन या. पाच लाख मोजा आणि बाकीचे पोलीसात वाटून टाका.

पोलिसांनी पोती आणली. पोत्यातून नोटा निघायला लागल्यावर सगळे हक्काबक्का झाले. पोत्यात नोटा भरल्याचे दुर्मीळ दृश्य पुणे शहर बघत होते. पाच लाख तर निघालेच. वरचे पन्नास हजार पोलीसात वाटून टाकले गेले.

आमचे चुलत आज्जे (आजोळचे) त्या बंदोबस्तात होते. त्यांनाही पैसे मिळाले. नेमकी रक्कम ठाऊक नाही आता.

त्या जागेवर आज्जाने सिनेमा हॉल बांधला. त्याचे नाव राहुल ! पुढे नातवाने आपल्या आजोबांचा फोटो एण्ट्रन्सला लावला होता. त्याच वेषात !

राहुलच्या उद्घाटनाला हिंदविजयच्या बुकींग क्लर्कला सन्मानाने बोलावले गेले. त्याच्याच मुळे पुणे शहराला एक आलिशान आणि अत्याधुनिक सिनेमा हॉल मिळाला.

७० एमएम स्क्रीन आणि स्टिरिओफोनिक ध्वनीयंत्रणेसह सर्व अत्याधुनिक यंत्रणा असलेले हे थिएटर लवकरच पुणेकरांच्या गळ्यातले ताईत बनले !

# आळूची वडी : पदराआड दडलेले स्त्री मनाचे लेअर्स !

जगाच्या पाठीवर स्प्रिंग रोल किंवा काठी रोलसारखे अनेक 'रोल' मिळतात, पण अस्सल मराठी माणसाला विचाराल, तर त्याच्या डोळ्यासमोर एकच हिरवं-पिवळं वेटोळं येतं, ते म्हणजे आपली लाडकी आळू वडी! या खमंग वडीचा इतिहास तसा खूप जुना आणि रंजक आहे. 'अळू' हे जगातील सर्वात जुन्या लागवड केलेल्या पिकांपैकी एक मानले जाते. मुळचा आग्नेय आशियातील हा वृक्ष हजारो वर्षांपूर्वी भारतात रुजला. संस्कृतमध्ये याला 'आरुकी' किंवा 'आलु' असे म्हटले जाई, ज्याचे उल्लेख प्राचीन आयुर्वेदिक ग्रंथांतही आढळतात. विशेष म्हणजे ही वडी केवळ महाराष्ट्राचीच मक्तेदारी नाही. गुजरातमध्ये ती थोड्या अधिक गोडव्यासह 'पात्रा' म्हणून ओळखली जाते, तर हिमाचलमध्ये 'पतौड' आणि कर्नाटकच्या किनारपट्टीवर तांदळाच्या पिठाचा वापर करून केलेली 'पाथ्रोडे' ही याचीच प्रादेशिक रूपं आहेत. महाराष्ट्रात तर भाद्रपद महिन्यात गौरी-गणपतीच्या नैवेद्यात अळूची वडी असणे हे मांगल्याचे आणि समृद्धीचे प्रतीक मानले जाते.

सध्या बाहेर मस्त गुलाबी थंडी पडली आहे आणि अशा या गारठ्यात आळू वडी खाणं म्हणजे केवळ भूक शमवणं नाही, तर ते एक 'इमोशन' आहे. वरकरणी पाहिलं तर हे फक्त पानांचे रोल, पण जरा बारकाईने, एखाद्या 'फूड क्रिटिक'च्या नजरेने आणि संवेदनशील मनाने पाहिलं, तर आळूची वडी बनवणं हे एखाद्या इंजिनिअरिंग प्रोजेक्टपेक्षा कमी नाही आणि त्याहीपुढे जाऊन ते भारतीय स्त्रीच्या आयुष्याचं एक सुरेख रूपक वाटतं. या वडीची सुरुवातच मुळात बाजारातून हत्तीच्या कानासारखी दिसणारी ती पानं निवडून आणण्यापासून होते. निसर्गानेच ही पानं अशी बनवली आहेत की, त्यावर पाण्याचा थेंबही टिकत नाही. आजच्या स्त्रीचंही तसंच काहीसं झालं आहे; जगाची टीका, अपेक्षांची ओझी ती अंगावर घेते, पण नकारात्मक गोष्टी ती मनाला लावून घेत नाही, अगदी त्या 'वॉटरप्रूफ' पानांसारखीच ती अलिप्त राहते !

वडी बनवतानाची पहिली आणि महत्त्वाची पायरी म्हणजे पानांच्या मागच्या जाड शिरा सुरीने सफाईदारपणे काढून टाकणे. जर या शिरा तशाच राहिल्या, तर वडी वळताना पान फाटतं. हे स्त्रीच्या आयुष्यातील 'जुळवून घेण्याच्या' वृत्तीचं उत्तम उदाहरण आहे. संसाराचा गाडा हाकताना, कुटुंबाला एकत्र ठेवताना तिला अनेकदा स्वतःचा 'अहंकार' किंवा स्वभावातील 'ताठरपणा' या शिरांसारखा बाजूला काढावा लागतो. एकदा का तो ताठरपणा गेला, की मग परिस्थितीनुसार हवं तसं वळता येतं, न फाटता आणि न तुटता! पानांची तयारी झाली की वेळ येते ती बेसनाचं सारण लावण्याची. या वडीची खरी गंमत तिच्या थरांमध्ये आहे. जेव्हा एका पानावर दुसरं आणि दुसऱ्यावर तिसरं पान रचलं जातं, तेव्हा ते स्त्रीच्या आयुष्यातील विविध भूमिकांचं दर्शन घडवतं कधी मुलगी, कधी पत्नी, कधी आई तर कधी सून. या सगळ्या भूमिकांना एकत्र बांधून ठेवणारं जे बेसनाचं पीठ असतं ना, ती म्हणजे तिची 'सोशिकता' आणि 'समजूतदारपणा'!

येथे विज्ञानाची आणि परंपरेची एक सुंदर सांगड घातली गेली आहे. अळूच्या पानात 'कॅल्शियम ऑक्झलेट'चे स्फटिक असतात, ज्यामुळे घशाला खाज सुटू शकते. हा दोष घालवण्यासाठी आपल्या पूर्वजांनी प्राचीन काळापासून चिंच आणि गुळाचा वापर करण्याची पद्धत शोधली. संसारात फक्त गोडवा असून चालत नाही आणि फक्त कडक शिस्त (आंबटपणा) असूनही चालत नाही. गोड गुळाचा आणि आंबट चिंचेचा अचूक समतोल साधला, तरच त्या वडीला आणि आयुष्याला खरी चव येते. हे लेअर्स एकमेकांवर रचताना वडीची गुंडाळी मात्र एकदम घट्ट असावी लागते. जर ही गुंडाळी सैल पडली, तर तेलात

सोडल्यावर वडी विस्कटते. हे एका गृहिणीने घराला लावलेल्या 'शिस्तीचं' प्रतीक आहे. तिने प्रेमासोबतच संस्कारांची घट्ट वीण धरून ठेवली नाही, तर घर विस्कटायला वेळ लागत नाही !

काही मंडळी घाईने वडी तळतात, पण खरी पद्धत म्हणजे वडी आधी १५-२० मिनिटे वाफवून घेणे. हे स्त्रीच्या आयुष्यातील 'संयमाचं' पर्व आहे. जोवर ती अनुभवांच्या आणि संकटांच्या वाफेतून तावून-सुलाखून निघत नाही, तोवर ती 'पक्की' होत नाही. इथेच एक अत्यंत नाजूक टप्पा येतो, जो अनेकदा दुर्लक्षित राहतो तो म्हणजे वडी थंड होऊ देणे. वाफवलेली वडी आगीतून बाहेर आल्यावर तिला शांत, निवांत होऊ द्यावं लागतं. गरम डोक्याने घेतलेले निर्णय आणि गरम असताना कापलेली वडी, दोन्हीही शेवटी विस्कटतातच! त्यामुळे मनाची आणि वडीची धग शांत झाली, की मगच तिला सुरी लावायची, म्हणजे तिचे पदर अखंड राहतात. सुरीच्या एका घावात जेव्हा त्या वडीचे तुकडे पडतात, तेव्हा आत दडलेली ती 'सुवर्णवलयं' नजरेत भरतात. बेसनाच्या पिवळ्या धमक गाभ्यात गुंडाळलेली ती पानांची हिरवी नक्षी म्हणजे जणू संसाराच्या चक्रव्यूहातही स्वतःचं अस्तित्व हिरवंगार ठेवणाऱ्या स्त्रीमनाचं प्रतिबिंबच!

जेव्हा अशी थंड झालेली वडी संकटांच्या तापलेल्या कढईत तळली जाते, तेव्हाच ती खरी 'खंबीर' आणि 'कुरकुरीत' होते. काही घरात नुसती तळलेली वडी न खाता, तिला वरून मोहरी, हिंग आणि कढीपत्त्याची खमंग फोडणी दिली जाते. तेलात तडतडणारी मोहरी आणि त्यातून उठणारा तो सुगंधी ठसका, संसाराच्या साध्यासुध्या वरणात 'लज्जत' आणणाऱ्या सुखद धक्क्यांसारखा असतो. विशेषतः सध्याच्या थंडीच्या दिवसात या वडीवर सढळ हाताने पेरलेले 'पांढरे शुभ्र तीळ' शरीराला हवी तशी उब देतात. पण हे सगळं करूनही, कधीकधी घशात 'खवखव' होतेच. चिंचेचा कोळ त्या खाजऱ्या पानांना वेसण घालत असला, तरी कधीकधी एखादं बंडखोर पान घशाची वाट लावतंच. पण म्हणून आपण वडी खाणं सोडतो का? मुळीच नाही! वरून पाण्याचा घोट घ्यायचा आणि पुढची कुरकुरीत वडी तोंडात टाकायची; नात्यांतल्या कुरबुरींकडे दुर्लक्ष करून पुढे जाण्याचंच हे दुसरं नाव आहे !

आणखी एक गंमत म्हणजे, जगाच्या पाठीवर रेसिपी तीच असली, साहित्य तेच असलं तरी प्रत्येक घरातल्या आळू वडीची चव निराळी असते! कारण त्यात पडणारा मायेचा मसाला आणि हाताची चव कुठल्याच पुस्तकात मोजता येत नाही. ती त्या 'अन्नपूर्णे'ची स्वतःची सही असते. शेवटी, आपल्या जुन्या आजी-पणजींनी शोधलेली ही रेसिपी 'झीरो वेस्ट'चाही उत्तम नमुना आहे. वडी उकडायला लावल्यावर पातेल्यात उरलेलं बेसनाचं पीठ, घरातील मुलं बोटाने चाटून पुसून खातात, त्या 'चाटून खाल्लेल्या' पिठात जी मायेची चव असते, ती पंचपक्वान्नातही नसते. अंगात उबदार स्वेटर, हातात वाफाळलेलं आलं-गवती चहा आणि सोबतीला डिशमध्ये ४-५ खमंग, तीळ लावलेल्या कुरकुरीत आळू वड्या... यालाच तर हिवाळ्यातला 'मोक्ष' म्हणतात ! त्यामुळे, पुढच्या वेळी ताटातली ती सुवर्णवलयं धारण केलेली आळू वडी खाताना फक्त तिची चव घेऊ नका, तर त्यामागचे कष्ट, तिचा प्राचीन इतिहास आणि संसाराला चविष्ट बनवणाऱ्या त्या 'अन्नपूर्णे'चे आभार मानायला विसरू नका. कारण आळू वडी ही फक्त डिश नाही, तर ती संस्कार, संस्कृती, संयम आणि स्त्रीत्वाची एक खमंग कहाणी आहे!

**- मंगेश दोरके**


**सोने-चांदी मौल्यवान खरेदी !**

# गोखले ब्रदर्स

**सराफी दुकान**

**रविवार, दि. 1 पुष्य नक्षत्र**

**आपलं दुकान**

**महाद्वार रोडवर, 0231-2546585**

# नुकत्याच झालेल्या श्री गणेश जयंतीच्या निमित्ताने...

एक प्रसिद्ध आख्यायिका आहे की, व्यासांनी श्रीगणेशाला महाभारत लिहिण्यासाठी लेखनिक होण्याची विनंती केली. लिहिताना मला थांबावे लागू नये अशा प्रकारे सलग मजकूर सांगण्याची अट श्रीगणेशाने घातली. सलग मजकूर सांगताना थोडी सवड मिळावी म्हणून व्यासांनी श्रीगणेशाला प्रतिअट घातली की, त्याने महाभारत लिहिताना नव्या आणि परिपूर्ण अक्षरसंचासह आणि नव्या परिपूर्ण लेखन पद्धतीने लिहिले पाहिजे.

श्रीगणेशाने ही अट पाळताना व्यासांच्या उच्चारांचे नीट अवलोकन केले. उच्चारांशी सुसंगत अक्षरचिन्हे निवडली. लेखन वेगाने होण्यासाठी श्रीगणेशाने जोडाक्षर पद्धती विकसित केली. श्रीगणेशाने तेव्हा विकसित केलेल्या लेखन पद्धतीत काही बदल होत होत आजची मराठी देवनागरी लिपी उपलब्ध झाली आहे. ही उपलब्ध लिपी अतिशय शास्त्रीय आहे. जगातील सर्व मानवांना तेहेतीस मणके असतात. या तेहेतीस मणक्यांशी या देवनागरी लिपीतील तेहेतीस चिन्हे एकास एक संगतीने जुळलेली आढळतात, त्यांना सध्या मराठी देवनागरी लिपीतील तेहेतीस व्यंजनचिन्हे म्हणून ओळखले जाते. मणक्यांच्या वरील भागातील मुखाशी संबंधित सोळा उच्चारांशी सोळा अक्षरचिन्हे जुळलेली आहेत त्यांना मराठी देवनागरी स्वरचिन्हे म्हणून सध्या ओळखले जाते. या चिन्हांच्या सहाय्याने श्रीगणेशाने जोडाक्षर पद्धतीही विकसित केली. यासह तीन संयुक्त व्यंजनचिन्हेही श्रीगणेशाने निर्माण केली. श्रीगणेशाने ही सर्व बावन्न चिन्हे ॐ या बीजाक्षराच्या विविध अवयवांपासून निर्माण केली होती. या बावन्न चिन्हांचा उपयोग करून २०७३७ दोन अक्षरी जोडाक्षरे, ७४६४९६ तीन अक्षरी जोडाक्षरे, २६८७३८५६ चार अक्षरी जोडाक्षरे, ९६७४५८८१६ पाच अक्षरी जोडाक्षरे निर्माण होतात. श्रीगणेश या देवाने हा अक्षरसंच व लेखन पद्धती निर्माण केली आणि ती नागरिकांच्या वापरासाठी खूपच सोयीची ठरली म्हणून कोणीतरी विद्वानाने या व्यवस्थेला देवनागरी लिपी हे नाव दिले. या लिपीतील ग , ण , श ही तीन अक्षरचिन्हे या लिपीतील इतर चिन्हांपेक्षा वेगळी आहेत. या तीन चिन्हांच्या बाराखडीतील पहिल्या स्थानी सुट्टा काना आहे. ग,ण,श या तीन अक्षरांचे हे वेगळेपण, ही स्वर व्यंजन व्यवस्था गणेश या देवतेनेच निर्माण केल्याचे सूचक मानून श्रद्धाळू गणेशभक्त देवनागरी लिपीला गणेशविद्या म्हणतात.

गणेशविद्या या चिन्ह व्यवस्थेत स्थळ, काळानुरूप बदल होत होत सध्या वापरात असलेल्या मराठी, हिंदी, तमिळ, कन्नड, बांग्ला, उडिया, मल्याळी, तेलुगू, गुजराती, पंजाबी, शारदा लिप्या विकसित झाल्या आहेत. श्रीगणेशाने मानवाला दिलेल्या या वैज्ञानिक लेखन व्यवस्थेची माहिती गणेश चतुर्थी निमित्त सर्व जगापर्यंत पोचवावी हे आवाहन!

सर्वांना गणेश जयंतीच्या हार्दीक शुभेच्छा ! तुमच्या मनातील सर्व मनोकामना पूर्ण होवोत, सर्वांना सुख, समृध्दी, ऐश्वर्य, शांती, आरोग्य लाभो हीच बाप्पाच्या चरणी प्रार्थना !

**गणपती बाप्पा मोरया , मंगलमुर्ती मोरया !!!**

• Regd. No. MAHMAR/2015/66822 Navsneha Monthly •
Posting Under Concessional Rate Regd. No. KLR-335/2025-2027


# SHOGINI TECHNOARTS PVT. LTD.

ISO 9001-2008
UL Approved

Manufacturers of Printed Circuit Boards
Metal Clad PCBs for LED applications.



- Manufacturing Excellence in Fabrication of Single Layer, Two Layer & Multilayer PCBs.
- Multilayer PCBs - Prototype & volumes.
- High density SMT, Fine Line Boards - 6 mil Tracks/0.25 mm Via holes.
- RoHS Compliance
- Top Class Testing facilities including Universal BBT with SMD Testing.
- Large Manufacturing Capacity 1,60,000 Sq. mtrs. per annum.
- Well equipped plant with ultra modern Machines
- Fastest Delivery at competitive price.
- Satisfied Customers all over India & Abroad.
- CAD-CAM, Prototype, Large Scale Production under one roof.

**Quality Approvals**
ISO 9001-2000 Certified & UL Approved
Also approved by C-DOT, BSNL, RDSO




**HEAD OFFICE :**
"SHOGINI" S. No. 5 (P) Katraj-Dehuroad By Pass, Near Sinhagad Road Flyover, Ambegaon Budruk, Pune 411046 (INDIA)
Tel.: +91 20 6647 1700 Fax. : +91 20 6647 1714

**FACTORY :**
Gat No. 788, Khed - Shivapur, Taluka Haveli, Dist. Pune 412 205. (INDIA) Tel. : +91 20 6647 1800
Fax. : +91 20 6647 1820

**E-mail :** info@shogini.com
**Visit us at :** www.shogini.com


प्रति,
सौ./श्री.

कोल्हापूर चित्पावन संघाचे हे मुखपत्र संपादक-मुद्रक-प्रकाशक श्री. सदानंद दिनकर मराठे यांनी
मुद्रिका कमर्शियल प्रिंटर्स, १३०५, ए वॉर्ड, शिवाजी पेठ, कोल्हापूर येथे छापून कोल्हापूर चित्पावन संघ, तुळजाभवानी संकुल,
गुरुमहाराज वाड्याजवळ, मंगळवार पेठ, कोल्हापूर येथून प्रकाशित केले आहे.